दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–५३ | सोमवार दि.३ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पर्यावरण जपा अन्यथा गंभीर परिणाम

या पंधरा दिवसांत देश भरातील तापमानात प्रचंड वाढ झाली. काही ठिकाणी पारा अगदी ५० च्या जवळ गेला. दरवर्षी तापमानात होत जाणारी वाढ चिंतेचा विषय आहे. यंदा तर अनेकांचा उष्मा घाताने मृत्यू झाला. पर्यावरणात झालेले बदल मानवाच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण करू लागले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरण जागरूकतेसाठी जगभरात प्रयत्न केले जात आहेत. वेगवेगळे उपाय योजिले जात आहेत. मात्र, तरीसुद्धा पर्यावरणाचा असमतोल वाढतच चालला आहे. ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून साजरा केला जातो.

### कळंबा कारागृहात मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीचा खून

कोल्हापूरः मुंबईमधील १९९३ च्या बॉम्बस्फोट हल्ल्यातील आरोपी असलेला व सध्या कळंबा कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्याचा निर्घृण खून करण्यात आला. मुन्ना उर्फ मोहम्मद अली खान उर्फ मनोज कुमार भवरलाल गुप्ता असे मृत कैद्याचे नाव आहे. रविवारी (दि.२) सकाळी साडेसात वाजण्याचे सुमारास ही घटना घडली. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी मुन्ना उर्फ मोहम्मद अली खान हा कारागृहातील हौदावर आंघोळ करण्यासाठी गेला असता हा प्रकार घडला. न्यायालयीन बंदी आरोपी प्रतीक उर्फ पिल्या सुरेश पाटील, दीपक नेताजी खोत, संदीप शंकर चव्हाण, ऋतुराज विनायक इनामदार, सौरभ विकास सिद्ध या पाच जणांनी ड्रेनेज वरील लोखंडी झाकणाने मारहाण केली.

# मराठवाड्यात पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर

## » जायकवाडी धरणाचा पाणीसाठा पाच टक्क्यावर

**संभाजीनगर। प्रतिनिधी**

**जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मराठवाड्यातील सहाही जिल्ह्यांमध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. जलसंपदा विभागाच्या माहितीनुसार, सध्या मराठवाडा विभागातील मोठ्या ४४ प्रकल्पात केवळ ८.७४ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. अशातच जायकवाडी धरणाचा पाणीसाठा देखील पाच टक्क्यांपर्यंत घसरला आहे. यामुळे मराठवाड्यात पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर निर्माण झाला आहे.**

राज्यातील सर्वच भागांमध्ये सध्या भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. गेल्याच आठवड्यात राज्यातील दुसरे सर्वात मोठे धरण असलेले उजनी धरण इतिहासातील सर्वात निच्चांकी पातळीवर पोहचले असल्याचे समोर आले होते. १९८० साली यापूर्वी उजनी धरणाने ४४ वर्षातील सर्वात निच्चांकी पातळी ओलांडली गाठली होती. आता राज्यात प्रमुख धरण असलेल्या आणि मराठवाड्यासाठी अत्यंत महत्वाचे असलेल्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा अवघ्या पाच टक्के पाणीसाठ्यापर्यंत घसरला आहे. गेल्या पाच वर्षात मे महिन्याच्या अखेरीस जायकवाडीचा असलेला हा



सर्वात कमी जलसाठा आहे. यामुळे सध्या मराठवाड्याला भीषण पाणी टंचाईचा सामना करावा

◀◀ पान २ वर

### मे अखेरपर्यंत साठा झाला कमी

पाऊस कमी झाल्याने यंदा मराठवाड्यासह राज्यस्तील अनेक भागांमध्ये दुष्काळाचे सावट सर्वत्र घोंगावत होते. यात धरणात असलेला पाणी साठा बाष्पीभवनामुळे कमी होत गेला. परिणामी जायकवाडी धरणात सद्यस्थितीला केवळ ५ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. मे महिना अखेरपर्यंत साठा मोठ्या प्रमाणात कमी झाला असून, मागील पाच वर्षातील हा सर्वात कमी साठा असल्याचे जलसंपदा विभागाचे म्हणणे आहे.

## फोडाफोडीचे राजकारण जनतेला रुचले नाही: एकनाथ खडसे

**जळगाव । प्रतिनिधी**

**एक्झिट पोलचा निकाल पाहता ३५० च्या वर जागा मिळतील अशी चिन्हे आहे. तसेच राज्यात फोडाफोडीचे राजकारण आणि शेतकऱ्यांच्या समस्या पाहता जनतेला हे फारसे रुचलेल दिसत नसल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे काही जागा कमी झाल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकसाठी महायुतीने आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचे माजी मंत्री एकनाथ खडसे म्हणाले.**



लोकसभा निवडणुकीच्या निकालासंदर्भात एबीपी माझा आणि सी व्होटर्सचे एक्झिट पोल जाहीर करण्यात आले आहेत. या संदर्भात राज्याचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मागील काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी काही विकासकामं केली आहेत, ते पाहता जनतेने त्यांना पुन्हा एकदा पाठींबा दिल्याचे पाहायला मिळत असल्याचे एकनाथ खडसे म्हणाले. चारशे पार होईल अशी आपल्याला अपेक्षा नव्हती. मात्र साडेतीनशे पार होईल हा विश्वास होता. तसेच राज्यात मात्र फोडाफोडीचे राजकारण आणि शेतकऱ्यांच्या समस्या

◀◀ पान २ वर

## केजरीवालांनी केले तिहार कारागृहात आत्मसमर्पण



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रविवारी (दि.२ जून) दुपारी तिहार तुरुंगात आत्मसमर्पण केले. दिल्ली मद्य धोरण प्रकरणी ईडीने केलेल्या अटकेनंतर लोकसभा निवडणूक प्रचारासाठी त्यांना सर्वोच्च न्यायालयाने २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. याची मुदत शनिवार १ जून रोजी संपली होती.**

आत्मसमर्पणापूर्वी दुपारी तीन वाजता केजरीवाल आपल्या निवासस्थानातून राजघाटवर गेले. येथे त्यांनी महात्मा गांधी यांना आदरांजली वाहली. यानंतर केजरीवाल आणि त्यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांनी कॅनॉट प्लेस येथील हनुमान मंदिरात

◀◀ पान २ वर

### ईव्हीएममध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होतोय

अरविंद केजरीवाल म्हणाले, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या एका एक्झिट पोलने राजस्थानमध्ये भाजपला ३३ जागा दिल्या आहेत, तर तिथे फक्त २५ जागा आहेत. त्यांना मतमोजणीच्या ३ दिवस आधी बनावट एक्झिट पोल का करावा लागला हा खरा मुद्दा आहे, यासंदर्भात अनेक सिद्धांत आहेत, त्यापैकी एक म्हणजे ते मशीनमध्ये (ईव्हीएम) फेरफार करण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

### भगतसिंगांप्रमाणे फाशी जायला तयार

भगतसिंग म्हणाले होते की जेव्हा सत्ता हुकूमशाही बनते तेव्हा तुरुंग ही जबाबदारी बनते. देशाला स्वतंत्र करण्यासाठी भगतसिंग यांना फाशी देण्यात आली होती. यावेळी मी तुरुंगात जात असताना मला कळत नाही. परत येईल. भगतसिंग यांना फाशी झाली तर मी सुद्धा फाशी जायला तयार आहे, असेही केजरीवाल या वेळी म्हणाले.

## अरुणाचलमध्ये पुन्हा भाजप, सिक्कीममध्ये एसकेएमचा डंका

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या निकालापूर्वी अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभेचे निकाल रविवारी लागले. अरुणाचल प्रदेशमध्ये ६० पैकी ४६ जागा मिळवत पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाने तर सिक्कीम मध्ये सत्ताधारी असलेल्या क्रांतिकारी मोर्चाने ३२ पैकी ३१ जागा मिळवत दणदणीत बहुमत मिळवले. देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला अरुणाचल प्रदेशात केवळ



१ जागा मिळवता आली तर सिक्कीममध्ये मात्र खातेही उघडता आले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने अरुणाचल प्रदेशात ३ जागा मिळवल्या.

◀◀ पान २ वर

### अजित पवारांची तीन जागा जिंकत मुसंडी

राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) अरुणाचल प्रदेशात १४ जागांवर निवडणूक लढवली होती. यापैकी तीन जागांवर अजित पवार गटाला यश मिळाले आणि १० टक्क्यांहून अधिक मते मिळाली आहेत. तर अन्य ३ जागांवर अजित पवार गटाचा निसटता पराभव झाला. निवडणूक आयोगाने अजित पवारांचा गट म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे, असा निकाल दिल्यानंतर महाराष्ट्र राज्याबाहेर पहिल्यांदा अजित पवार गटाला विजय मिळाला आहे. त्यामुळे अजित पवार गोटात उत्साह आहे. अरुणाचल प्रदेशात निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये लिखा सोनी, निख कामीन, टोकू टातुंग यांचा समावेश आहे. अजित पवार गटाच्या या यशामुळे पक्षाला राष्ट्रीय दर्जा मिळू शकतो. महाराष्ट्रासह नागालँड, झारखंड आणि आता अरुणाचल प्रदेशात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) लोकप्रतिनिधी, आमदार आहेत.

## पंतप्रधानांनी घेतला रेमल चक्रीवादळाच्या परिस्थितीचा आढावा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

ईशान्येकडील राज्यांमध्ये चक्रीवादळानंतरच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी रविवारी बैठक घेतली. गेल्या काही दिवसांपासून 'रेमल' चक्रीवादळामुळे आलेला पूर, मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे ३६ पेक्षा अधिक



लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये दोन लाखांहून अधिक लोक प्रभावित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर

◀◀ पान २ वर

### उत्तर प्रदेशमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के

नवी दिल्लीः उत्तर प्रदेशातील सोनभद्र या जिल्ह्याच्या ठिकाणी भूकंपाचे सौम्य धक्के बसले. रविवारी (दि.२ जून) दुपारी ३ वाजून ४९ मिनटांनी भूकंपाचे धक्के जाणवले. त्याची तीव्रता ही ३.९ रिश्टर स्केल इतकी होती, अशी माहिती राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने पोस्टवरून दिली आहे. भूकंपामुळे जिल्ह्यात घबराट पसरली आणि लोक घाबरून घराबाहेर पडले. मिळालेल्या माहितीनुसार, भूकंपाची तीव्रता ३.९ इतकी मोजली गेली आहे, मात्र यामध्ये कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०१ जून २०२४

आवक क्किंटलमध्ये तर भाव प्रतिक्किंटलचे आहेत


| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू : १८.०० क्किंटल | २,२०० | २,७३० | २,४६३ |
| ज्वारी/हायब्रिड :७४.५० क्किंटल | १,७५० | ३,९५० | २,५५३ |
| मूग : १.५० क्किंटल | ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : १३.५० क्किंटल | १०,४५० | ११,९८१ | ११,३२९ |
| उडीद : ०.५० क्किंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ४३.०० क्किंटल | २,२०० | २,८४५ | २,५३५ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्किंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन:३६.५० क्किंटल | ४,४७५ | ४,५०० | ४,४८७ |
| हरभरा: ९.०० क्किंटल | ६,३०० | ६,५०१ | ६,४१४ |

## चार जूनपर्यंत मॉन्सून रत्नागिरीत येण्याची शक्यता

### हवामान विभागाची माहिती, मराठवाड्यातही पाऊस

**पुणे । प्रतिनिधी**

**उन्हाच्या कडाक्यामुळे विदर्भ, मराठवाड्यात प्रचंड उकाडा जाणवत आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान चाळिशीपार नोंदवले जात आहे. काही भागांत तर तापमान ४५ अंशांवर गेले आहे. त्यामुळे चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, वर्धा या ठिकाणी नागरिक हैराण झाले आहेत. मात्र, आता लवकरच राज्यात मान्सून दाखल होणार असून, तळकोकणात म्हणजे रत्नागिरीत तो ४ जूनपर्यंत येण्याचा अंदाज आहे, असे भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) म्हटले आहे.**



रेमल चक्रीवादळाच्यामुळे बंगालच्या उपसागरावरील मान्सून

◀◀ पान २ वर

### » मान्सूनच्या एन्ट्रीची चाहूल

२ जूनपासून नैऋत्य मोसमी वाऱ्यांना गती मिळणार आहे. सध्या अरबी समुद्र खवळलेला आहे. तर दुसरीकडे नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा वेगही वाढल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान, कोकण किनारपट्टीच्या समुद्राचा रंग देखील बदलला असून, समुद्र किनारपट्टी भागात वेगवान वारे वाहण्यास सुरूवात झाली आहे. परिणामी, ही मान्सूनच्या एन्ट्रीची चाहूल असल्याचे हवामान विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे. महाराष्ट्रात १० किंवा ११ जून रोजी मान्सून दाखल होण्याची शक्यता याआधीच भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे.

## ..तर मी स्वत:ला संपवून घेईन: बजरंग सोनवणे

### निवडणुक अधिकारी महेंद्र कांबळे यांना धमकी; जरांगे पाटलांच्या आंदोलनाचा मला फायदा



**बीड । प्रतिनिधी**

**कांबळे साहेब हात आकडू नका. अन्यथा मी स्वत:ला संपवून घेईन, असे वक्तव्य बजरंग सोनवणे यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. स्ट्राँग रुमच्या पाहणीदरम्यान बजरंग सोनवणे यांनी संबंधित वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर बीडच्या राकारणात काय–काय घडामोडी घडतात ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाचा मला फायदा होणार आहे. बीडची निवडणूक वनसाईड झाली आहे. त्यामुळे माझा १०० टक्के विजय होणार, असा दावा त्यांनी केला आहे. तसेच पंकजा मुंडे यांना कळले असेल मी किती ताकदीचा उमेदवार आहे, असेही ते म्हणाले.**

बजरंग सोनवणे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील निवडणूक ही विकासावरच झाली. जातीपातीची नुसती चर्चा झाली. महाराष्ट्राचा जो मूड महाविकास आघाडीच्या बाजूने आहे. तोच मूड बीड जिल्ह्यात सुद्धा आहे. हे सर्वे कसे करतात काय करतात याबाबत मला माहीत नाही. पण, मी बीड लोकसभा निवडणुकीतून शंभर टक्के निवडून येणार

◀◀ पान २ वर

### दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

दरम्यान, बीड लोकसभा मतदारसंघातील लढत ही अत्यंत महत्वपूर्ण मानली जात आहे. ही निवडणुक पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्यात होत असली तरी यात एका बाजूला धनंजय मुंडे, खा. प्रितमताई मुंडे, आ. सुरेश धस, आ. लक्ष्मण पवार, माजी आ. अमरसिंह पंडीत, आ. प्रकाश सोळंके, रमेश आडसकर, आ. बाळासाहेब आजबे यांची तर दुसरीकडे मनोज जरांगे पाटील, आ. संदिप क्षीरसागर यांच्या प्रतिष्ठेची आहे. आता या निवडणुकीत नक्की कोण बाजी मारणार याचे चित्र ४ जूनला स्पष्ट होणार आहे.

### पोलीस अधीक्षकांकडून मतमोजणी केंद्राची पाहणी

बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी मतमोजणी केंद्राची पाहणी केलीय. यादरम्यान पोलीस प्रशासनास योग्य त्या सूचना केल्या आहेत. बीडमधील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय परिसरात ४ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. याच ठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त लावला गेला. रविवारी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी सुरक्षेच्या दृष्टीने आढावा घेऊन पाहणी केली.

# मे महिन्यात उष्माघाताने देशात ४६ जणांचा मृत्यू

## » मध्य प्रदेशात सर्वाधिक १४ तर महाराष्ट्रातील ११ जणांचा समावेश



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देशभरात मे महिन्यात उष्माघाताने ४६ तर महाराष्ट्रात ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती केंद्र सरकारने दिली. उष्णघाताशी संबंधित आजार आणि मृत्यूची आकडेवारी केंद्र सरकारने जाहीर केली. या सरकारी आकडेवारीनुसार, उन्हाळ्याच्या ३ महिन्यांमध्ये उष्माघातामुळे देशात ५६ लोकांचा मृत्यू झाला.**

उन्हाळ्यामध्ये उष्णतेच्या लाटेचा प्रभाव वाढला होता, मे महिन्यामध्ये तर उत्तर भारतासह देशभरात अति उष्णतेचा प्रभाव जाणवला. भारतीय हवामान खात्याच्या विभागानुसार यंदा मे महिन्यात सलग जास्त दिवस उष्णतेची लाट होती. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात आणि उष्णतेशी संबंधित आजारांचे प्रमाण वाढले आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार, उष्माघाताने मध्य प्रदेशात सर्वाधिक १४ मृत्यूची नोंद झाली. तर महाराष्ट्र ११, आंध्र प्रदेश ६ आणि राजस्थान ५ अशा मृत्यूच्या नोंदी झाल्या. देशात एकूण २४,८४९ उष्माघाताच्या घटनांची नोंद झाली. यामध्ये मध्य प्रदेशात सर्वाधिक ६,५८४ उष्माघाताची प्रकरणे नोंदवली गेली आहेत.

अग्रलेख

# पर्यावरण जपा अन्यथा गंभीर परिणाम

या पंधरा दिवसांत देश भरातील तापमानात प्रचंड वाढ झाली. काही ठिकाणी पारा अगदी ५० च्या जवळ गेला. दरवर्षी तापमानात होत जाणारी वाढ चिंतेचा विषय आहे. यंदा तर अनेकांचा उष्मा घाताने मृत्यू झाला. पर्यावरणात झालेले बदल मानवाच्या अस्तित्वावरच प्रश्न निर्माण करू लागले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरण जागरूकतेसाठी जगभरात प्रयत्न केले जात आहेत. वेगवेगळे उपाय योजिले जात आहेत. मात्र, तरीसुद्धा पर्यावरणाचा असमतोल वाढतच चालला आहे. ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून साजरा केला जातो. तो पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता निर्माण करून, समस्या जाणून घेऊन पर्यावरणाची गुणवत्ता वाढावी म्हणून पोषक वातावरण निर्माण करणे हाच पर्यावरण दिन साजरा करण्या मागचा प्रमुख हेतू आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास का होतो? पर्यावरणाचे संतुलन का बिघडते? याला आपण किती जबाबदार आहोत? निसर्गातील बदल, अनियमितपणा किती कारणीभूत आहे? याचाही विचार करावा लागेलच. खरं म्हणजे, पर्यावरण आणि प्रदूषण यांचा खूप जवळचा संबंध आहे. अनेकविध प्रकारच्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास प्रामुख्याने होत असतो. मग निसर्गनिर्मित असो वा मानवनिर्मित असो, याचा विचार करणे गरजेचे आहे. निसर्गनिर्मित कारणांमुळे होणाऱ्या कारणावर आपण काय करणार? ती एक प्रकारची आपत्तीच असते. पण आपल्याकडून ज्या ज्या कारणांमुळे प्रदूषण निर्मिती होते ती आपण नक्कीच कमी करू शकतो. दरवर्षी पर्यावरण दिवस साजरा करताना एक घोषवाक्य असते. जसे ५ जून २०११ सालात भारताची प्रथमच यजमानपदी निवड झाली होती. ''वन निसर्ग आपल्या सेवेसी'' असे घोषवाक्य होते. परत दुसऱ्यांदा ५ जून २०१८ मध्ये भारताची यजमानपदी निवड झाली, तेव्हा ''प्लास्टिक प्रदूषणाशी संघर्ष'' असे घोषवाक्य होते. पर्यावरण दिवस कोलंबियात साजरा झाला, त्यावेळी ''जैवविविधता'' हे घोषवाक्य होते. जैवविविधता म्हणजेच जीवांची विविधता. मग त्यात पशू, पक्षी, निरनिराळे प्राणी येतात. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जैवविविधता संपन्न असायला हवी. आपण बघतो निरनिराळ्या कारणांमुळे ही कमी होत आहे. त्याच्यावर उपाययोजना करायला हव्यात.

पृथ्वीवरील जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण होणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे. हाच या मागील हेतू आहे. पर्यावरणाचा ऱ्हास मुख्यत्वे प्रदूषणाने होतो. वायुप्रदूषण/हवेतून होणारे ध्वनिप्रदूषण, जलप्रदूषण, जुनी इलेक्ट्रिक उपकरणे, प्लास्टिक कचरा, वातावरणातील बदलाने निर्मित होणारे पर्यावरण अर्थातच निसर्गनिर्मित प्रदूषण. २०२४ च्या जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना जमीन पुनर्स्थापना वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिबंध अशी आहे. जमिनीची पुनर्स्थापना यामध्ये जंगल क्षेत्र वाढवणे, मातीची धूप रोखणे, शाश्वत शेती पद्धतीचा अवलंब करणे आणि नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करणे यांसारख्या उपाययोजना येतात. वाढत्या वाळवंटीकरणामुळे पाण्याची कमतरता आणि हवामान बदलाचा धोका वाढण्याची मोठी शक्यता असते. त्यात दुष्काळ ही एक गंभीर समस्या आहे. वाढते तापमान, अनियमीत पाऊस यामुळे दुष्काळाची तीव्रता वाढते आहे. शेती उत्पादन कमी होणे आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणे या गोष्टी संभावतात. या सर्व गोष्टी पर्यावरणाशी निगडित आहेत.

कारखान्यांतील निर्मिती प्रक्रियेतून वायू, धूर यांची निर्मिती होत असते. बऱ्याच वेळी हा वायू आरोग्यासाठी हानिकारक तर असतोच पण त्यामुळे सभोवतालचे वातावरण दूषित होते. वाहनांची संख्या खूप वाढली आहे. जुनी वाहने, वेळीच सर्व्हिसिंग न होणारी वाहने खूपच धूर सोडतात. त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. आपल्याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. वाहन तपासणी होते. पोल्युशन प्रमाणपत्र बंधनकारक आहे. पण कुठेतरी या दोन्हीही प्रक्रियेत काहीतरी दोष आहेत. त्यात सुधारणा हवी आहे तरच पर्यावरणाचा समतोल साधला जाऊ शकतो आणि वाढते तापमान यावर अंकूश येऊ शकतो, अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील.

# शिवराज्याभिषेक सोहळा भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन ६ जून 'लोकोत्सव'

## 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' ठरणार मुख्य आकर्षण

बीड। प्रतिनिधी

**कोल्हापूर : 'राज्याभिषेक' शिवछत्रपतींच्या कर्तृत्वाचे सुवर्णपान, यवनी सत्तांच्या अत्याचारातून महाराष्ट्रभूमीला स्वातंत्र्याचा हंकार देणार हा क्षण. शिवरायांच्या प्रेरणेने मर्द मराठ्यांच्या तलवारी याच मातीत तळपल्या आणि स्वराज्याचे स्वप्न साकार आले. हजारो मावळ्यांच्या, सर्वसामान्यांच्या बलिदानातून महाराष्ट्रभूमी पावन झाली. दुर्गराज रायगडावर शिवरायांचा ६ जून १६७४ ला 'राज्याभिषेक' झाला, मोठ्या थाटामाटात राज्याभिषेकाचा सोहळा पार पडला अन् सार्वभौम राज्य स्थापन झाल्याची द्वाही दाहीदिशा फिरली. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राहावी, या हेतूने प्रतिवर्षी ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य प्रमाणात शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदा या ऐतिहासिक घटनेस ३५० वर्षे पूर्ण होत आहेत.**

### ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षिदार व्हा-गंगाधर काळकुटे, पूजा मोरे, ऋषिकेश बेदरे, गोपाळ धाडे

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२४ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होत आहे. यंदा 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर



शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' व 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' कार्यक्रम शिवराज्याभिषेक महोत्सवाचे आकर्षण बिंदू असणार आहेत. देशभरातील लाखो शिवभक्तांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

यंदा गडावर पाच जूनला सायंकाळी पाच वाजता 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची' हा शिवकालीन युद्धकला प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम होणार आहे. महाराष्ट्रातील युद्धकला आखाड्यांचा यात सहभाग असणार आहे. महाराष्ट्राची पारंपरिक युद्धकला कशी असते, याचे दर्शन गडावर येणाऱ्या तमाम देशवासियांना व्हावे, हा त्यामागचा उद्देश आहे. पट्टा, तलवार, भाला, विटा, जंबिया, कट्यार, माहू, फरी गदका यांच्या विविध प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. सायंकाळी सात वाजता राज दरबार येथे 'जागर शिवशाहीरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा' हा शाहीरी कार्यक्रम होणार आहे, या कार्यक्रमात महाराष्ट्रातील शाहीर सहभाग घेणार आहेत. त्याचबरोबर ६ जूनला मेघडंबरीतील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला सुवर्ण नाण्यांचा अभिषेक झाल्यानंतर 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' या पालखी मिरवणुकीत महाराष्ट्रातील बारा बलुतेदार, अठरा अलुतेदारांसह सर्व धर्मातील लोक सहभागी होणार आहेत. आपापल्या पारंपरिक लोककलांचा मिरवणुकीत जागर घालणार आहेत. राजसदर, नगारखाना, होळीचा माळ, बाजारपेठ ते जगदीश्वर मंदिर असा पालखी सोहळ्याचा मार्ग असेल. या मार्गावरून पालखीवर पुष्पवृष्टी केली जाणार आहे. सर्व शिवभक्तांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## माळशिरसला चार दिवसांआड पुरवठा

अकलूज । वृतसंस्था

माळशिरस शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी असलेल्या तळ्याची पाणी साठवण क्षमता कमी आहे. त्यामुळे माळशिरसकरांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत असून तळ्याची साठवण क्षमता वाढवावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. सुरवातीच्या काळात शहराला शहरालगत असलेल्या महाबळेश्वर विहिरीमधून पाणीपुरवठा केला जात होता. गावचा विस्तार झाल्यानंतर तसेच लोकसंख्येत वाढ झाल्यानंतर १९९० च्या सुमारास फुलेनगर येथे नीरा कालव्यानजीक १ कोटी ९० लाख लिटर पाणी साठवण क्षमता असलेले तळे करण्यात आले.

न्यायालयाजवळ ३ लाख लिटर पाणी क्षमता व शारसी जीवन प्लॉट येथे २ लाख ६० हजार पाणी साठवण क्षमता असलेल्या पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या. त्यामधून शहरास पाणी पुरवठा केला जात आहे. या दोन्ही टाक्या भरण्यास साधारण १८ तास लागतात. नीरा कालव्यालगत तळे असल्याने पाण्याची कमतरता भासत नाही. परंतु कालव्याचे पाणी बंद झाल्यानंतर तळ्यात गाळ असल्याने व पाणी साठवण क्षमता कमी असल्याने पाण्याची टंचाई निर्माण होत आहे. सध्या शहरात चार दिवसानंतर पाणी सोडले जात आहे. त्यामुळे नागरिकांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे. जुन्या पाणीपुरवठा योजनेची टाकी जुनी झाल्याने यावर असलेल्या नळांना मोटारीने पाणी सोडले जात आहे. गावाची वाढती लोकसंख्या पाहता नवीन पाणी पुरवठा योजना उभारणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्राच्या लेकीला गुजरात मधील पतीने दिले घरातून हाकलून

## आई व लहान मुलीवर उपासमारीची वेळ

परळी । प्रतिनिधी

**परळी तालुक्यातील इंजेगाव येथील अश्विनी वैजनाथ कराड या नवविवाहित महिलेचा विवाह सख्ख्या मामाने एका एजेंटच्या मध्यस्थीने अहमदाबाद गुजरात येथील सोन्याचे व्यापारी जितू प्यारेराजमल जैन मुलासोबत रिवाजाप्रमाणे लाऊन दिला.**

जितू जैन नामक भामटा पती सोन्याचा व्यापारी आहे, परंतु तो भाड्याच्या घरात राहत होता . विवाह झाल्या पासून दोन वर्ष अश्विनी जैन/ कराड या पत्नी सोबत गुण्यागोविंदाने सुखात संसार केला व व्यवस्थित, चांगल्या पद्धतीने नांदवल्यानंतर दोन वर्षात दोन गोंडस मुलींचा देखील जन्म झाला, पण हळूहळू अश्विनी जैन कराड ला आई-वडिलांकडून पाच लाख रुपये घेणे म्हणून त्रास सुरू झाला, त्यामध्ये पती जितु व ननंद या दोघांचा सक्रिय सहभाग होता. घरात कोंडून ठेवणे, शेजाऱ्यांना बोलू न देणे. मानसिक व शारीरिक छळ सुरू झाला पण



फरक पडत नसल्याने सासरकडील मंडळीने पुढील पाऊल म्हणून पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेण्यास सुरुवात केली. मोबाईल वापरावर बंदी आणली गेली. व इथूनच सर्व सुखी संसाराचे वाटोळे होण्यास झाले. अहमदाबाद गुजरात येथिल जितू जैन पती एवढा हुशार की त्याने आधार कार्ड ते सर्व कागदपत्रे पत्नी अश्विनी जैन/ कराड ला मिळूच दिले नाहीत. तीला ते देण्या पासुन वंचित ठेवले. कुठल्याही कामाला आधार कार्ड हा महत्त्वाचा पुरावा मानला जातो तो देखील तिच्याकडून विस्कटून घेला. व अश्विनी जैनला एका लहान नऊ महिन्याच्या चिमुली सह घराबाहेर हाकलून दिले. तेव्हापासून तिची फरकट चालू आहे. आई-वडिलांची नाजुक व गरिबीची असल्यामुळे आई-वडील देखील सांभाळण्यास सक्षम नाहीत. न्याय मिळावा म्हणून ४९८ चा गुन्हा देखील पती जितू जैन यांच्यावर दाखल केला. पण त्याने जमानत मिळवला व आज मोकळा फिरत आहे. कोर्टाच्या तारखेला देखील उपस्थित राहत नाही. उलट अश्विनीच्या भावालाच त्यांनी खोटे केस मध्ये अडकवले. म्हणजे तिला भावाने देखील सपोर्ट करू नये ही आमची भूमिका होती. दोन वर्षापासून कोर्ट कचेरी खर्चामुळे आई-वडिलांना राहते घर विकण्याची वेळ आली आहे. अद्याप या प्रकरणात न्याय मिळाला नाही. जितू प्यारेराजमल जैन हा सोन्याचा व्यापारी आहे व त्याचे अहमदाबाद गुजरात येथे सोन्याचे दुकान चालवतो आहे. त्याला चार बहिणी देखील आहेत. पतीच्या व ननंदबाईच्या कारस्थानामुळे हा सुखी संसार उध्वस्त झाला आहे. महिलेच्या आई वडिलांची आर्थिक परिस्थिती हालाखीची नाजुक आहे. जावई जितू जैन यांना पैसे देऊ शकली नाही. वडील वॉचमन, भाऊ ट्रक ड्रायव्हर, आई घरकाम करते. आज आई मुलीवर उपासमारीची वेळ आहे. लहान मुलगी सोबत असल्यामुळे तिच्या देखील शिक्षणाचे व राहण्याची समस्या निर्माण झाली आहे. सध्याही आई व मुलगी न्यायाच्या प्रतीक्षेत असून न्यायालयीन लढाई लढत आहे. मोठी मुलगी आई पासून तोडली गेली आहे व ती पतीकडे अहमदाबाद गुजरात मध्ये आहे, परंतु आध्यप पर्यंत तरी म्हणजे दोन वर्षे झाले महिलेला घटस्फोट मिळत नाही व न्याय पण मिळत नाही. अशी परिस्थिती गेल्या दोन वर्षापासून हे प्रकरण चालु आहे . अन्यायग्रस्त अस्मिता जितू जैन /कराड या महिलेने माध्यमां समोर येऊन आपल्याला न्याय मिळावा असा टाहो फोडला आहे.

## २६७ कोटी ५१ लक्ष अर्थसहाय्य वितरित; ३२,००० हुन अधिक गंभीर रूग्णांचे वाचले प्राण

# गोरगरीब-गरजू रूग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष ठरला आशेचा किरण

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील गरीब आणि गरजू रूग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष वरदान ठरत आहे. दरम्यान, गेल्या १ वर्ष ११ महिन्यांत ३२,००० पेक्षा अधिक गोरगरीब-गरजू रुग्णांना एकूण २६७ कोटी ५१ लक्ष रूपयांची वैद्यकीय मदत देण्याचा विक्रम शिंदे सरकारने केला आहे. दरम्यान, ना वशिला, ना ओळखीची आवश्यकता नसून वैद्यकीय मदतीसाठी रूग्ण आणि रूग्णांच्या नातेवाईकांनी थेट मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले आहे.**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रूग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रूग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता महाराष्ट्र राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना ठरत असल्याचे प्रतिपादन राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी केले आहे. गोरगरीब-गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत असल्याने मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रूग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये याची दक्षता घेण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी दिले आहेत. यानुसार आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने गेल्या १ वर्ष ११ महिन्यात ३२,००० पेक्षा अधिक गोरगरीब-गरजू रुग्णांना एकूण २६७ कोटी ५१ लक्ष रुपयांची आर्थिक मदत वितरित केली



आहे. श्री.एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारताच महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद पडलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष तात्काळ सुरू केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची मूळ संकल्पना मांडणाऱ्या मंगेश नरसिंह चिवटे यांची विशेष कार्य अधिकारी म्हणून नियुक्ती करून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी या कक्षाची जबाबदारी दिली होती. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता मदत मिळवण्यासाठी मंत्रालयात जाण्याची ही गरज नाही पूर्णपणे ऑनलाईन प्रोसेस करून वैद्यकीय मदत मिळणार असल्याचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी सांगितले. यासाठी ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट आपल्या मोबाईलवर अर्ज मिळविता येईल. संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मध्ये अनेक-विविध आजारांचा समावेश देखील करण्यात आला असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी दिली आहे. यामध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधिर लहान मुलांच्यासाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश आहे. दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन कक्षप्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी केले आहे.

## पान १वरून...

### मराठवाड्यात पाण्यासह

लागत आहे. छत्रपती संभाजीनगर शहरासह जवळपास ४०० गावांना जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा करण्यात येतो. यातून सुमारे ४० लाख नागरिकांची तहान भागविली जाते. मात्र गेल्या वर्षी कमी पाऊस पडला, परिणामी हे जायकवाडी धरण पूर्णपणे भरले नाही. त्यामुळे रब्बी पिकांसाठी पाण्याचे रोटेशन आणि पाणी पुरवठा योजनेसाठी करण्यात येणारा उपसा यामुळे धरणातील पाणी पातळी कमी कमी होत गेली जी सध्या पाच टक्क्यांपर्यंत खाली आली आहे.

----------

### केजरीवालांनी केले तिहार

दर्शन घेतले. त्यानंतर केजरीवाल हे आम आदमी पार्टी कार्यालयात पोहोचले. येथे त्यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधताना केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. यानंतर ते तिहार कारागृहाकडे रवाना झाले. सायंकाळी पाच वाजता यांनी तिहार कारागृहात आत्मसमर्पण केले. पक्ष कार्यालयात बोलताना केजरीवाल म्हणाले की, ''सर्वोच्च न्यायालयाने मला निवडणुकीच्या प्रचारासाठी २१ दिवसांचा जामीन मंजूर केला. त्याबद्दल मी सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानतो. मी पुन्हा तिहार तुरुंगात जात आहे. या २१ दिवसांपैकी एक मिनिटही मी वाया घालवला नाही. मी फक्त आम आमदी पार्टीसाठी प्रचार केला नाही तर मुंबई, हरियाणा, झारखंड मध्ये गेलो. आपल्यासाठी देश महत्वाचा आहे. मी हुकूमशाहीविरुद्ध आवाज उठवला म्हणून पुन्हा तुरुंगात जात आहे. पंतप्रधान मोदींनी देशासमोर हे मान्य केले की त्यांच्याकडे माझ्याविरुद्ध कोणताही पुरावा नाही''

-----------

### फोडाफोडीचे राजकारण

पाहता जनतेला हे फारसे रुचलेल दिसत नसल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे काही जागा कमी झाल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीने आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.

------------

### पंतप्रधानांनी घेतला रेमल

प्रमुख अधिकाऱ्यांसह पंतप्रधानांनी चक्रीवादळानंतरची परिस्थिती आणि देशात असलेल्या उष्णतेच्या लाटेसंदर्भात आढावा बैठक घेतली. 'रेमल' चक्रीवादळामुळे सततचा पाऊस आणि भूस्खलनामुळे ईशान्येकडील काही भाग मोठ्या प्रमाणात प्रभावित झाला आहे. काही ठिकाणी रेल्वे ट्रॅक पुराच्या पाण्याखाली बुडाले आहेत. ईशान्य फ्रंटियर रेल्वेने मंगळवारपासून दक्षिण आसाम, त्रिपुरा, मणिपूर आणि मिझोरामला जाणाऱ्या एक्स्प्रेस, पॅसेंजर आणि मालगाड्याही रद्द केल्या आहेत. काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. या सर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी आढावा बैठक घेतली. देशात विविध राज्यांमध्ये उष्णतेची तीव्र लाट आहे. उष्णतेच्या लाटेमुळे अनेक ठिकाणी तापमान मोठ्या प्रमाणात वाढले आहे, याचाही आढावा या बैठकीत घेण्यात आला. पंतप्रधान मोदींनी यापूर्वी 'रेमल' चक्रीवादळानंतर नैसर्गिक आपत्तींदरम्यान ईशान्येकडील राज्यांमधील परिस्थितीबद्दल दु:ख व्यक्त केले होते आणि सर्व शक्य सहकार्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले की, केंद्र सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. अधिकारी प्रभावित झालेल्या लोकांना आणि भागांना मदत करण्यासाठी अधिकारी जमिनीवर काम करत आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पंतप्रधान मोदी म्हणाले की, ''आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, त्रिपुरा आणि पश्चिम बंगालमध्ये रेमल चक्रीवादळामुळे मोठा भाग प्रभावित झाला आहे. नागरिकांना नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागला. जी लोक या परिस्थितीमुळे प्रभावित झाली, त्या सर्वांसोबत माझ्या प्रार्थना आहेत. परिस्थितीचा आढावा घेऊन केंद्र सरकारने राज्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे आणि प्रभावित झालेल्यांना मदत करण्यासाठी अधिकारी सतत काम करत आहेत.'' असेही ते म्हणाले.

----------

### अरुणाचलमध्ये पुन्हा भाजप,

देशात सात टप्प्यात पार पडलेला लोकसभा निवडणुकीचे निकाल ४ जूनला लागणार आहेत. तत्पूर्वी अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभेचे निकाल लागले. या दोन्ही राज्यांमध्ये कोणाची सत्ता असेल हे चित्र स्पष्ट झाले आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये पुन्हा एकदा भाजप तर सिक्कीममध्ये पुन्हा सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा सत्ता स्थापन करणार आहे. भाजपने अरुणाचल प्रदेशात १० जागा आधीच बिनविरोध जिंकल्या होत्या. अरुणाचल आणि सिक्कीम विधानसभेसाठी १९ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान झाले होते. अरुणाचलमध्ये भाजपने ४२ जागा जिंकल्या होत्या.

### सिक्कीममध्ये एसकेएमचा दणदणीत विजय

सिक्कीममध्ये लोकसभा निवडणुकीत एसकेएम एनडीएमध्ये आहे. मात्र विधानसभा निवडणूक त्यांनी स्वतंत्र लढवली आहे. सिक्कीम विधानसभेत एकूण ३२ जागा आहेत. ३२ पैकी ३१ जागा मिळवत एसकेएमने दणदणीत विजय मिळवला आहे. मागील विधानसभा निवडणुकीत एसकेएमने १७ जागा मिळवत बहुमत मिळवले होते. गेल्या वेळी प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंटला (एसडीएफ) यावेळी मात्र एकच जागा मिळाली आहे.

----------

### चार जूनपर्यंत मॉन्सून

सक्रिय झालेला आहे. त्यामुळे मान्सूनला कुठेही अडथळा येणार नाही. मान्सूनने यावर्षी अकरा दिवस अगोदरच पूर्वोत्तर राज्यांसह सिक्कीम आणि पश्चिम बंगालपर्यंत मजल मारलेली आहे. मान्सूनच्या अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील दोन्ही शाखा रविवारपासून अधिक बळकट होतील. ज्यामुळे मध्य महाराष्ट्रात २ ते ५ जूनपर्यंत बऱ्याच जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल. मराठवाड्यात २ ते ५ जून नांदेड, धाराशिव, लातूर येथे, तर ३ ते ४ जून रोजी बीड जिल्ह्यांत वादळवाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पाऊस पडेल. असेही हवामान विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे. दरम्यान, पुढील पाच दिवस विदर्भ, मराठवाड्यात आणि कोकणात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. तर विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा या ठिकाणी पुढील तीन दिवस उष्णतेची लाट येऊ शकते. ४ जूनपासून रत्नागिरीत वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल. ५ जूनपर्यंत विदर्भातील काही जिल्ह्यांत येलो अलर्ट असणार आहे. असेही हवामान विभागाने आपल्या अंदाजात म्हटले आहे.

------------

### ..तर मी स्वत:ला संपवून

आहे, असे त्यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांनी उभा केलेल्या मराठा आरक्षणाचा फायदा जरी मला झाला असला तरी मला सगळ्या समाजाने मतदान केले. मनोज जरांगे पाटील यांनी कुणाला विरोध करण्याची भूमिका घेतली नाही. मी या निवडणुकीत कोणत्याही नेत्याविरोधात वैयक्तिक आरोप केले नाहीत. पण माझ्यावर जे वैयक्तिक आरोप झाले त्याला मला उत्तर द्यावं लागेल. वैयक्तिक आरोप प्रत्यारोप ऐकायला बरे वाटतात. त्यामुळे कुणालाही मते पडतात, असे अजिबात नाही. मी या निवडणुकीत उमेदवारी घेतल्यानंतर होणाऱ्या परिणामाचा विचार केला नाही. यापूर्वी सुद्धा माझ्यावर काय परिणाम झाला हे सगळ्यांना माहीत आहे. फक्त हे परिणाम अगदी घराच्या चुलीपर्यंत येऊ नयेत, एवढीच माझी अपेक्षा आहे, असे त्यांनी म्हटले. तसेच पंकजा मुंडे यांना आता कळले असेल की मी किती ताकदीचा उमेदवार आहे, असा टोलाही सोनवणे यांनी लगावला. स्ट्राँग रुमला येण्याचे कारण हे की, जिल्हाधिकारी इथे आहेत. त्यांच्याशी मला काही चर्चा करायची आहे. त्यामुळे मी इथे आलो आहे. त्यांनी मला काही गोष्टी विचारल्या आहेत. त्यामुळे त्यांना प्रत्यक्षात येऊन बोलतो, असे म्हणालो. याशिवाय स्टाँग रुमच्या पाहणीसाठी इथे आलो आहे, अशी प्रतिक्रिया बजरंग सोनवणे यांनी दिली माध्यमांशी बोलताना दिली. कांबळे हे एकतर्फी वागतात, काहीही चुकीचे इथे झाले नाही पाहिजे, नाहीतर मी स्वत:ला संपवून घेईन, अशी धमकी निवडणुक अधिकारी महेंद्र कांबळे यांना सोनवणे यांनी दिली.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ३ जून २०२४


## स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना सर्वलाभ सन्मानाने मिळावेत - प्रा.ईश्वर मुंडे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात किल्ले धारूर शहराचे नाव सुप्रसिध्द आहे ते हुतात्मा काशिनथराव चिंचाळकर यांचे बलिदान तसेच त्यांच्या सोबतच्या इतर स्वातंत्र्य सैनिकांच्या पराक्रमाने. धारूर येथील स्वातंत्र्य संग्राम घटनेत हुतात्मा काशिनाथराव चिंचाळकर यांच्या सोबत सतत असणारे स्वातंत्र्य सैनिक स्व.नरहरीराव औसेकर (काशीद) यांचे कुठुंब सध्या संभाजीनगर येथे वास्तव्यास आसते.



यांच्या पत्नी कुसुमबाई औसेकर,मुलगा प्रशांत,सून शिल्पा,व नातू नागेश्वर व योगेश्वर किल्ले धारूर येथे आले आसता त्यांचा प्रा.ईश्वर मुंडे, राज्य प्रमुख, सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष तसेच संभाजीनगर विभागीय पत्रकार अधिस्वीकृती समिती सदस्य अनिल महाजन यांनी शाल - पुष्पहार देवून सन्मान केला. या वेळी स्वा.सै. पत्नी कुसुमबाई यांनी आपले अनुभव व आठवणी सांगितल्या. पुढे त्या म्हणाल्या की, हुतात्मा काशीनाथराव चिंचाळकर यांचे सोबत स्वातंत्र सैनिक स्व.नरहरीराव औसेकर (काशिद) हे सतत असायचे परंतू हुतात्मा काशिनाथराव चिंचाळकर यांच्या हट्टामुळे त्या घटनेच्या दिवशी धारूर येथून जाऊन भारतसरकारचे रणगाडे या भागात घेऊन येऊन मराठवाडा मुक्तिसंग्रामात स्वा.सै. स्व. नरहरीराव औसेकर (काशिद) यांनी महत्वाची भुमिका बजावली.पुढे बोलताना हुतात्मा पत्नी कुसुमबाई औसेकर म्हणाल्या की,मला निवृत्ती वेतन मिळते परंतू ईतर कांही ही लाभ मिळालेल् ? नाहीत तरी शासकीय नियमानुसार मिळणारे लाभ मिळावेत ते मिळालेले नाहीत अशी खंत ही व्यक्त केली.या वेळी प्रा ईश्वर मुंडे म्हणाले की,स्वातंत्र्य सैनिकांचे खडतर जीवन,त्यांचा त्याग व बलिदान आठवणीत ठेवून सर्व स्वातंत्र्य सैनिकांच्या कुंटूंबास शासनाकडून मिळणारे सर्व लाभ सन्मानपूर्वक मिळावेत.या साठी प्रसासकीय पातळी वर सर्वतोपरी सहकार्य करून सर्व लाभ मिळवून देवू.

# वाढत्या सोशल मिडियाच्या वापराने तरुण पिढी डिजिटल घडण्या ऐवजी बिघडत(च) चालली

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

आपला भारत देश 'जगातील सर्वांत तरुण देश' म्हणून ओळखला जातो. भारतात सुमारे ५८.३ टक्के लोकांचे वय २९ वर्षांपेक्षा कमी आहे आणि ३०-४० या वयोगटातील लोकांची टक्केवारी ४१ टक्के आहे. तरीदेखील आपला देश इतर देशांच्या तुलनेत एवढा मागे का? याचे उत्तर शोधायला गेल्यावर एक भयाण वास्तव समोर येते,ते म्हणजे सोशल मीडिया व इंटरनेट यांच्या अजगरी विळख्यात अडकलेली आणि भान नसलेली तरुण पिढी.हे वास्तव चिंता वाटायला लावणारे आहे.इंटरनेटचा शोध लागला आणि सर्व जग जवळ यायला सुरुवात झाली. डिजिटल जगात कोणतीही माहिती मिळवणे किंवा कोणतीही गोष्ट आत्मसात करणे एकदम सुकर होऊन गेले.परंतु इंटरनेटची जशी चांगली बाजू आहे,तशी वाईट बाजूदेखील आहे. इंटरनेटवर भरपूर अशा गोष्टी आहेत, ज्या कोणत्याही व्यक्तीला वेड लावतात आणि वाईट गोष्टींच्या आहारी नेतात.

त्यानंतर येतो सोशल मीडिया.खरे तर याचा शोध दूर असलेल्या लोकांना एकत्र आणण्यासाठी आणि त्यांच्यात संवाद साधण्यासाठी लागला होता, पण आता त्याचे विपरित परिणाम दिसू लागले आहेत. सोशल मीडियाच्या आहारी जाऊन लोक 'सोशल' न राहता 'एकलकोंडे' होत आहेत. विशेषतः तरुण पिढी त्यात जास्तच गुंतत गेली आहे. ती या आभासी दुनियेलाच सर्वस्व मानायला लागली आहे.इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲप,स्नॅपचॅट ही ॲप्स अक्षरशः तरुण व किशोरवयीन मुला-मुलींना वेड लावत आहेत. परिणामी त्यांच्यासाठी मोबाईल जीव की प्राण होत चालला आहे, किंबहुना झाला आहे. मोबाईलच्या अति वापरामुळे तरुण मुले-मुली अनेक घातक आजारांचे बळी होत चालले आहेत.सोशल मीडियामुळे अनेक लोकांचे आयुष्य उदध्वस्त झाले आहे.त्यामुळे सर्जनशीलता, विवेक,ध्येय व संयम हे शब्दच आजकालच्या तरुण-





### सोशल मिडियाचा शोध ;दुर असलेल्या लोकांना एकत्र आणून त्यांच्यात संवाद साधण्यासाठी!

### सोशल मिडियाच्या आहारी जात तरुण पिढी ''सोशल'' न राहता ''एकलकोंडे'' झाली

### मोबाईल-इंटरनेटच्या अतिवापरामुळे तरुण मुले-मुली आनेक घातक आजारांचे बळी

तरुणींच्या शब्दकोशातून नाहीसे होत चालले आहेत.सोशल मीडियाच्या विळख्यातून आजकालच्या तरुण-तरुणींना मोकळ करणे,ही काळाची गरज आहे.मोबाईलच्या वापरावर अंकुश घातला पाहिजे. मुलांना जास्तीत जास्त मैदानी खेळांमध्ये सहभागी करून घेतले पाहिजे.मैदानी खेळांमुळे मुलांमध्ये सांघिक भावना निर्माण होतात, तसेच जीवनात आपण सर्वांना घेऊन कसे पुढे जाऊ शकतो,याचे महत्त्व समजते.आभासी आणि खऱ्या जगातल्या फरकाची जाणीव करून दिली पाहिजे. आभासी दुनियेत अनेक मित्र असतात,पण खऱ्या दुनियेत वेळ प्रसंगी मित्र किंवा नातेवाईकांची गरज असते,याचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. आपण असेच या आभासी दुनियेत गुंतून पडलो,तर आपले आयुष्य उदध्वस्त होऊ शकते,हे त्यांना पटवून देता आले पाहिजे.कोणत्याही गोष्टीचे जसे वाईट उपयोग असतात, तसेच चांगले उपयोगदेखील असतात. तरुण-तरुणींनी या चांगल्या गोष्टींवर लक्ष द्यायची गरज आहे. उदा. युट्युबसारख्या प्लॅटफॉर्मवर अनेक चांगले कोर्सेस करायला व शिकायला मिळतात.अनेक चांगले वक्ते व त्यांचे विचार ऐकायला मिळतात.सोशल मीडियाला आपण पूर्णपणे टाळू शकत नसलो,तरी त्याचा वापर कमी करता येऊ शकतो. आठवड्यातील एक दिवस सोशल मीडियाच्या ॲप्सचा वापर पूर्णपणे टाळावा.त्यामुळे बाहेरचे सुंदर आणि वास्तव जग आपण पाहू शकू,त्याचा आनंद लुटू शकू.

तरुण-तरुणींचा पुस्तकांकडे कल वाढवला पाहिजे. पुस्तकांमध्ये माणसांचे आयुष्य बदलवण्याची ताकद असते. मानवी मनात उत्क्रांतीची सुरुवात पुस्तक वाचनापासून झाली आहे.प्रेम,दया, करुणा व दुसऱ्यांच्या भावनांचा आदर,ही मूल्ये तरुण-तरुणींमध्ये रुजवली पाहिजेत. आपण या देशाचे काहीतरी देणे लागतो,हे तरुण-तरुणींना समजले पाहिजे आणि आपल्या देशाचे भले करण्याचे कार्य त्यांना समजून सांगितले पाहिजे. आपले जीवन राष्ट्रहिताच्या ध्येयाशिवाय व्यर्थ आहे,याची जाणीव त्यांना झाली पाहिजे.

सोशल मीडियावर कोणताही नवीन ट्रेंड आला की,त्याला फॉलो करणे,हे आजकालच्या तरुण-तरुणींचे ध्येय होत चालले आहे. त्यात ते आपला अमूल्य वेळ व ऊर्जा वाया घालवत आहेत.सोशल मीडियावर जर आपण अपडेट किंवा कार्यरत राहिलो नाही,तर आपले अस्तित्वच संपून जाईल,अशी भीती त्यांना वाटत असते.तिथे मिळणारे लाईक्स व शेअर त्यांना एखाद्या पुरस्कारासारखे वाटतात आणि त्याचा त्यांना (फोल) अभिमानदेखील असतो.

आपण वास्तव आयुष्यात कसेही असलो तरी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपण आपल्याला कसे दाखवतो, याला त्यांच्यालेखी जास्त महत्त्व आले आहे.यामुळे आपण आपल्यातच एक विकृती निर्माण करतोय,याची जाणीव त्यांना राहत नाही.

सोशल मीडियाने तरुण व किशोरवयीन मुला-मुलींची संयमाची पातळी खूपच खालावून ठेवली आहे.तीस सेकंदांच्या वरची चित्रफित बघण्याचा संयम त्यांच्यामध्ये राहिलेला नाही. त्यामुळे कोणतेही काम हातात घेऊन ते पूर्ण करण्याच्या त्यांच्या क्षमता कमी होत चालल्या आहेत.परिणामी अनेक तरुण-तरुणी नैराश्य,अस्वस्थता, निद्रानाश व अनेक मानसिक रोगांची शिकार झाले,होत आहेत.
डॉ.ज्ञानेश्वर गिलबीले,(संजिवनी हॉस्पीटल, माजलगाव)

## भोजेवाडी येथे अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील भोजेवाडी हे गाव अतिशय छोटे व एकमेव धनगर समाज असणारे गाव आहे येथे

अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती मोठ्या उत्सवात पार पडली.. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी सौ. गजराबाई बाबासाहेब गोफणे सरपंच हिवरा,भोजेवाडी यांच्या सह व्यख्यानकर्त्या ह.भ.प राधिकाताई खेमनर,डॉ. शिवाजीराव राऊत रा. कॉ. पा. प्रदेश उपअध्यक्ष म. राज्य ओबीसी सेल, मा. युवराज खटके युवा मल्हार सेना कार्याध्यक्ष म. राज् ? य , मा अशोक ढवण माजी सभापती कृषी उ. बा . स. कडा, मा रामहरी महारनोर जि. प. सदस्य बीड, डॉ.शिवाजीराव शेंडगे रासपा प्रदेश सचिटणीस म. राज्य , मा भाऊसाहेब कोकरे सरपंच दादेगाव, मा महादेव दिंडे सरपंच मंगरूळ, मा राजेंद्र खुरंगे



सरपंच धनगरवाडी, मा बाळासाहेब कोळसे पाटील धनगर आरक्षण संघर्षयोद्धा आहील्यानगर, दत्तात्रेय खेमगर सरपंच हनुमंतगाव , मा शिवाजी बुरंगुले सरपंच साबलखेड, मा भाऊसाहेब गावडे सरपंच घोंगडेवाडी , इत्यादी आतिथि सह


शेंडगेवाडी व सुरनरवाडी येतील गजे पथक यावेळी उपस्थित राहून आपली संस्कृती प्रदर्शन केले, गावातील चिमुकल्यांनी या प्रसंगी भाषणातून अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन चरित्र सांगीतले , नारी शक्ती सन्मान सोहळा हा विशेष सन्मान सोहळा पार पडला या प्रसंगी युवा उद्योजक कृष्णा खटके, मच्छिंद्र गोफणे, सागर पारखे , अमोल खटके, सुखदेव खटके, अनिल पालवे, आबा पालेवे सह गावातील सर्व तरुण , कार्यकर्त्यांच्या सह कार्यातून कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला कार्यक्रमाचा शेवट गोड अशा स्नेहभोजनाने झाला.

## अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने ओबीसी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

### गुणवंत विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करावी - शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद विविध समाजकार्यात हिरारीने पुढाकार घेवून कार्य करत असते. सामाजिक बांधिलकी जोपासत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी घेण्यात आलेल्या १० वी, १२ वीच्या परीक्षेत ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांनी घवगवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशा बद्दल अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला असून प्रशासकीय अधिकारी व राजकीय मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे. ओबीसी



समाजातील गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनींचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन अखिल भारताचे ओबीसीचे नेते तथा माजी उपमुख्यमंत्री मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या आदेशानुसार व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष भाऊ राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने नाव नोंदणी करावी असे आवाहन समता परिषदेचे शहराध्यक्ष निखील शिंदे व नितीन राऊत यांनी केले आहे.

अखिल भारताचे ओबीसीचे नेते तथा माजी उपमुख्यमंत्री मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या आदेशानुसार व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष भाऊ राऊत यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व प्रशासकीय अधिकारी व राजकीय मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी समाजातील गुणवंतांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप पडावी व त्यांच्या कतृत्वाचा गौरव व्हावा या उद्देशाने गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. १० वी व १२वी परीक्षेत ७५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळविलेल्या व विविध विषयात प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने पुढील क्रमांकावर नोंदणी करावी शहराध्यक्ष निखील शिंदे मो. ९६१५८८५५५५, नितीन राऊत मो. ९७६५२०००९७, धनंजय काळे मो.९९२२१०८८५०, यांच्यासह समता परिषदेच्या तालुकाध्यक्ष यांच्याकडे आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, स्वप्नील शिंदे, रोहित जमदाडे यांनी केले आहे.

## सामाजिक सलोखा व शांतता राखावी - पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे यांचे आवाहन

**केज । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाकडून शांतता राखण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आपणही प्रतिसाद द्यावा. गावात सामाजिक सलोखा व शांतता राखा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे यांनी केले आहे.

युसुफवडगाव पोलीस ठाणे हद्दीतील होळ (ता.केज) येथे शनिवारी (दि.१) हनुमान मंदिरात शांतता समितीची बैठक पार पडली. यावेळी श्री.पतंगे हे बोलत होते.

व्यासपीठावर सरपंच पुत्र योगेश शिंदे, उपसरपंच बाळासाहेब घुगे, ग्रामपंचायत सदस्य तानाजी शिंदे हे होते. पुढे बोलताना पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे म्हणाले, युसुफवडगाव पोलीस हद्दीत सहायक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली कायदा सुव्यवस्था राखण्यात पोलिसांना यश आले आहे. होळ पंचक्रोशीतील नागरिकांनी सलोख्याची भूमिका घेतली आहे. ती यापुढेही कायम ठेवावी. सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तीविरोधात, तसेच सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर टाकणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देखील पोलीस उपनिरीक्षक राहुल पतंगे यांनी दिला आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक पतंगे, सहायक पोलीस उपनिरीक्षक रमेश सिरसाट, पो.हे.कॉ.भगवान खेडकर, पो.कॉ.कोंडीबा मेहत्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी)**

येथील वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या श्री शनी मंदिरात श्री शनैश्वर जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यास युवक,महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला. यावेळी ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या पायथ्याशी श्री शनी मंदिरात गेल्या १२ वर्षापासून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा श्री शनैश्वर जन्मोत्सवा निमित्त रविवारी (ता.०२) रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय कार्यात युवक, महिला, पुरुष यांचा मोठा प्रतिसाद लाभला. यावेळी ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी अनेकांनी सपत्नीक आपले रक्तदानाचे राष्ट्रीय कर्तृत्व पारपाडले. या रक्तदान शिबीरात रक्तसंकलनाचे कार्य स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रक्तपेढी आंबेजोगाई येथील डॉ.स्नेहल कराड, आनंद सिताप, जगदिश रामदासी, सैयद नजीर, बाबा शेख, श्री.यादव, शामली, रामप्रसाद, मुस्कान, वृषाली, स्वराज यांचे सहकार्य लाभले. रक्तदान शिबीराचे यशस्वी आयोजन श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट कमिटी, तेली युवक संघटना, श्री शनैश्वर प्रतिष्ठान, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा, शनैश्वर भक्त मंडळ, शनैश्वर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले होते.

## पाडळी येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा साई कोचिंग क्लासेसच्या वतीने गुणगौरव सोहळा

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

२०२३-२४ शैक्षणिक वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल सर्व गावकऱ्यांच्या वतीने जाहीर गुणगौरव सोहळा आयोजित केला होता. यामध्ये तालुक्यातून प्रथम येण्याचा मान साई कोचिंग क्लासेस चे विद्यार्थी-हर्षद बाबू कंठाळे यांनी पटकावत ९९.४०% गुण मिळवले तर द्वितीय :- शिवानी भारत आगलावे - ९७.८०% व तृतीय:- संपदा भाऊसाहेब इंगळे- ९७.४०% यांनी क्रमांक पटकावला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी पाडळी गावचे सरपंच श्री. गहिनाथ पाखरे सर व प्रमूख पाहुणे म्हणून सेवा सोसायटी चेअरमन भगवान भाऊ पाखरे हे आवर्जून उपस्थित राहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक श्री. के.डी. पाखरे सर यांनी केले. करिअर मार्गदर्शन करत पुढील वर्षी च्या टॉपर ला ५,०००/- रक्कम बक्षीस श्री. प्रकाश कंठाळे सर यांनी जाहीर केले. भविष्यातील विद्यार्थ्यांसमोरचे आव्हाने आणि त्या आव्हानांना कसे सामोरे जावे



याबाबती सखोल मार्गदर्शन श्री. राजेंद्र कंठाळे सर यांनी केले. आपले कच्चे दुवे शोधून त्यावर मात कशी करावी याविषयी नेपोलियन बोनपार्ट चे उदाहरण देऊन मार्गदर्शन श्री. गोरख सानप सर यांनी केले. साने गुरुजींच्या आई ने साने गुरुजींवर केलेले संस्कार याविषयी श्रीमती मनीषा पाटील मॅडम यांनी आपले मत मांडले. प्रतिकूल परिस्थितीत ही यश कशाप्रकारे गाठता येईल याबद्दल श्री. अशोक इंगळे(जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी) यांनी सखोल विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास कसा वाढवला पाहिजे, अभ्यासाची गोडी कशी लागते त्याच बरोबर काही जीवनातील उदाहरणे देऊन श्री शिवलिंग परळकर सर यांनी आपले मनोगत मांडले. नवनाथ सानप (पत्रकार) यांनी यश संपादन करण्यासाठी चा योग्य मार्ग व क्लासेसची नियमितता याबद्दल मत व्यक्त केले. श्री साई कोचिंग क्लासेसचा सर्व स्टाफ व विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री गहिनाथ पाखरे सर व भगवान पाखरे सर यांनी केले.

या सत्कार समारंभास, इतर मान्यवर उपसरपंच रामकीसन अप्पा इंगळे, समाधान इंगळे,अर्जुन कंठाळे साहेब, देविदास कंठाळे सर, मच्छिंद्र सानप, किरण अप्पा चव्हाण, चंद्रकांत पाखरे,अनिल कंठाळे,भारत आगलावे, बबन भाऊ पाखरे,दादा दुधाळ, भाऊसाहेब इंगळे, संतोष पाखरे, शहाजी इंगळे, बाबासाहेब मिसाळ, मिठू कंठाळे, कचरू पाखरे, श्री साई कोचिंग क्लासेस चे संचालक शिवराज कंठाळे सर, श्री.नारायण आंधळे सर, बटुळे सर, श्री.क्षीरसागर सर, श्री.सोनवणे सर आदी मान्यवर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

पान ६ वरून...

### नागरीकांनी प्रसार माध्यमांचा

टाळायची असेल तर अशा संभ्रमच्या वातावरणात प्रत्येक ग्रुपचे ॲडमिन यांनी आपल्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये जाऊन ऍडमिन ओन्ली सेटिंग करावी जेणेकरून कोणतीही आक्षेपार्य पोस्ट ग्रुप मध्ये व्हायरल करणार३ तसेच ग्रुप मधील सदस्यांकडून चुकून देखील अशी अप्रिय पोस्ट व्हायरल होणार नाही.. याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अशा प्रकारचे सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणार नाही अशी ग्वाही गावकरी यांनी पोलिसांना दिली. सौताडा आणि वाघिरा ठिकाणी मोठ्या संख्येने गावातील प्रतिष्ठित नागरिक हजर होते.

दोन्ही मिटींगचे आयोजन पाटोदा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री अनमोल केदार यांनी केले असून पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री माधव काटकर, पोलीस हवालदार श्री मच्छिंद्र उबाळे, श्री सचिन जायभाय, गहिनीनाथ गर्जे,पोलीस अमलदार भागवत खूपसे, सचिन कोळेकर, रियाज पठाण, भरत कोळेकर हजर होते

### मराठवाडा मुक्तीसंग्रामातील


त्यांना शासना कडून मिळणारा सम्मान त्यांचे प्रश्न आदी विषयक वर चर्चा झाली यावेळी प्रा ईश्वर मुंडे सर यांनी या कुंटूंबास प्रसासकीय पातळी वर सहकार्य करण्याचा शब्द दिला या वेळी त्यांचे सोबत ,मूलगा प्रशांत,सुन शिल्पा नातु नागेश्वर, योगेश्वर प्रशांत औसेकर

### दहावी परीक्षेतील गुणवंत

मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख महादेव मातकर यांनी शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानपत्र प्रदान करून कु.उत्कर्षा जाधव आणि उत्कर्षाचे वडील डॉ.ज्ञानेश्वर जाधव, आई सौ.सुनंदा जाधव, उत्कर्षाचा छोटा बंधू चि.शार्दुल यांचा गौरव केला.

# आता जनावरांच्या बाजारातही करता येईल एअर टॅगिंग

## पशुसंवर्धन विभागाचा पुढाकार



पुणे : जनावरांना एअर टॅगिंग केल्याशिवाय १ जून पासून जनावरांची खरेदी-विक्री करता येणार नसल्याची सूचना राज्याच्या पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात आली होती. या माध्यमातून भारत पशुधन या प्रणालीवर देशातील सर्व पशुंची अद्ययावत माहिती अपडेट करण्यात येणार आहे. पण विभागाकडून मोहीम राबवण्यात आल्यानंतरही अनेक शेतकऱ्यांनी जनावरांना एअर टॅगिंग केले नसल्याने आता जनावरांच्या बाजारामध्ये आलेल्या जनावरांची एअर टॅगिंग करण्यात येणार आहे.

जनावरांची खरेदी विक्री करताना शेतकऱ्यांची फसवणूक टाळणे तसेच राज्यातील सर्व पशुधनाची सर्वकष माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्व पशुधनाचे एअर टॅगिंग करुन त्याची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे. यामुळे विशिष्ट भागातून जनावरांची खरेदी-विक्री वाढणे, चाऱ्याची टंचाई, दुधाचे भाव पडणे, दुष्काळ या अनुषंगाने निर्णय घेणे प्रशासनाला शक्य होणार आहे. बाहेरच्या राज्यातून येणाऱ्या जनावरांची खरेदी - विक्री टॅगिंग करुन झाल्यास त्यांना रोगप्रतिबंधक लसीकरण प्राधान्याने करता येईल व बाहेरच्या राज्यातून आजारी जनावरे राज्यात दाखल झाल्याने होणारे साथ रोग प्रादुर्भाव यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. पशुधनाच्या बाजारामध्ये खरेदी-विक्रीसाठी करण्यात आलेल्या पशुधनाची माहिती विक्री करण्यात आलेल्या संबंधित जिल्ह्याच्या पशुसंवर्धन विभागास सादर करणे तसेच खरेदी-विक्री करण्यात आलेल्या पशुधनाची ईअर टॅगिंग करुन नोंदी अद्ययावत करणेबाबत निर्देशित केलेले आहे. तसेच बाजारामध्ये पशुधनाची ने-आण करताना कोणत्याही प्रकारची क्रूरता होणार नाही याची देखील दक्षता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

०००

बाजारात एअर टॅगिंग...

राज्यात सुमारे १५० पेक्षा अधिक जनावरांचे बाजार भरतात ज्यातील १५ बाजार सर्वात मोठे असून त्यामध्ये ५००० पेक्षा अधिक पशुधनाची खरेदी-विक्री करण्यात येते. ८०% पशुधनाच्या बाजारांमध्ये कमी, मध्यम संख्येच्या पशुधनाची खरेदी-विक्री केली जाते. पण बाजारात एअर टॅगिंग नसलेले पशुधन असल्यास त्यांची तिथेच एअर टॅगिंग केली जाणार आहे. या संदर्भात पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन पर्यवेक्षक यांच्या सेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे आता ज्या जनावरांना एअर टॅगिंग नाही अशा जनावरांना थेट बाजारात ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# जूनच्या शेवटी मिळणार पीएम किसानचा १७ वा हप्ता

## तत्पूर्वी करा ही तीन कामे!



पुणे : केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजनांच्या माध्यमातून सरकार शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याचे काम करत आहे. सरकारच्या अनेक योजनांपैकी एक योजना म्हणजे पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना. या योजनेच्या माध्यमातून सरकार वर्षभरात शेतकऱ्यांना ३ हप्त्यामध्ये ६००० रुपये आर्थिक मदत देते. आत्तापर्यंत शेतकऱ्यांना १६ हप्ते मिळाले आहे. आता लवकरच १७ वा हप्ता देखील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. मात्र, हा हप्ता जमा होण्यापूर्वी तीन महत्वाची कामे करावी लागतील, अन्यथा शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेच्या १७ व्या हप्त्याचे २००० रुपये मिळणार नाही.

सर्वप्रथम 'या' तीन गोष्टी करा :

ज्या शेतकऱ्यांनी ई-केवायसी पडताळणी केली नाही ते पीएम किसान योजनेच्या अधिकृत वेबसाइट ज्ञिळीरप.र्सीं.ळप वर जाऊन ई-केवायसी करु शकतात. ई-केवायसी पूर्ण केली असेल तरच पैसे जमा होतील, अन्यथा तुम्हाला १७ वा हप्ता मिळणार नाही. तसेच तुम्हाला जमिनीची पडताळणी करणेही आवश्यक आहे. तुम्ही असे न केल्यास तुमचा १७ वा हप्ता अडकू शकतो. यासाठी तुम्ही जवळच्या कृषी कार्यालयात जाऊ शकता. बँक खाते आधार कार्डशी लिंक करणे, नोंदणी फॉर्ममध्ये बरोबर माहिती भरणे या गोष्टींची पूर्तता करणे गरजेचे आहे. अन्यथा १७ वा हप्ता मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. पंतप्रधान किसान योजनेचा पुढचा हफ्ता आपल्या खात्यावर केव्हा जमा होईल, याची सर्वच शेतकऱ्यांना उत्सुकता लागली आहे. दरम्यान, पीएम किसान योजनेचा १७ वा हफ्ता जून महिन्याच्या अखेरीस जमा होण्याची शक्यता आहे. पंतप्रधान किसान निधी योजनेचा १६ वा हफ्ता २८ फेब्रुवारी २०२४ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला होता. आता लवकरच पंतप्रधान किसान सन्मान निधीचा सतरावा हफ्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

मिळते ६००० रुपयांची मदत : पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांची मदत केली जाते. यामध्ये चार महिन्याला २००० रुपयांचा हप्ता दिला जातो. आत्तापर्यंत १६ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. यासाठी ज्या शेतकऱ्यांनी ई-केवायसी केली नव्हती, अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी १७ व्या हप्त्यासाठी तात्काळ ई-केवायसी करणे गरजेचे आहे.

# कपाशीची सघन लागवड आणि अधिक उत्पादनासाठी खताचा वापर



सिंचनाची पुरेशी सोय झाल्यास मे महिन्यातच कपाशीची लागवड करता येईल, असे कृषी शास्त्रज्ञ सांगतात. सिंचनाची पुरेशी उपलब्धता नसल्यास, योग्य मान्सूनचा पाऊस येताच कपाशी पिकाची लागवड करावी. कापूस पिकाची लागवड चांगल्या पाण्याचा निचरा होणारी जमीन तयार केल्यानंतर करावी.

सध्या बहुतांश शेतकरी बीटी कपाशीची लागवड करत आहेत. अनुवांशिक अभियांत्रिकी मूल्यांकन समिती द्वारे अंदाजे बी.टी. कापसाच्या सुमारे २५० वाणांना मान्यता आहे. या सर्व जाती आपल्या राज्यात लावल्या जात आहेत. बीटी कापसात बीजी-१ आणि बीजी-२ असे दोन प्रकार आहेत. बीजी-१ मध्ये तीन प्रकारच्या डेंधू बोरर सुरवंट, ठिपकेदार सुरवंट, गुलाबी डेंधू बोरर आणि अमेरिकन डेंधू बोअरर या तीन प्रकारांना प्रतिकार आहे. या व्यतिरिक्त बीजी-२ प्रजाती तंबाखूच्या सुरवंटांना देखील प्रतिबंधित करते. साधारणपणे मध्य प्रदेशात कापसावर तंबाखूची सुरवंट दिसत नाही, त्यामुळे फक्त बीजी-१ जातीची लागवड करणे पुरेसे आहे. कापूस हे व्यापारी पीक आहे. याच्या लागवडीतून शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळू शकतो, मात्र त्यासाठी खतांची विशेष काळजी घेण्याची गरज आहे. साधारणपणे २.५ ते ३.० किग्रॅ सुधारित जाती. बियाणे (डी-फिलामेंटेड) आणि संकरित आणि बीटी वाणांचे १.० किलो. बियाणे (फायबरलेस) प्रति हेक्टर पेरणीसाठी योग्य आहेत. सुधारित जातींमध्ये चाफुली ४५-६० सें.मी. वर लागू केले जातात. संकरित आणि बीटीमध्ये, पंक्ती ते पंक्ती अंतर ९० ते १२० सेंमी आणि रोप ते रोप अंतर ६० ते ९० सें.मी.

सधन शेतीमध्ये किती झाडे : सघन कापूस लागवडीत ४५ सेमी अंतरावर ओळी लावल्या जातात आणि १५ सेमी अंतरावर झाडे लावली जातात. अशा प्रकारे, एक हेक्टरमध्ये १,४८,००० झाडे लावली जातात. बियाणे दर हेक्टरी ६ ते ८ किलोग्रॅम ठेवले जाते. त्यामुळे उत्पादनात २५ ते ५० टक्के वाढ होते. यासाठी योग्य वाणांना ६५१ (२००३), सूरज (२००२), ०८१ (१९८९), ५१ (१९९२), ४८ (२०१३), जवाहर ताप्ती, ४ आणि ५ अशी नावे दिली जाऊ शकतात.

किती खताची गरज आहे : कापसाच्या सुधारित जातींना प्रति हेक्टरी ८०-१२० नायट्रोजन आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ४०-६० किलो स्फुरद, २०-३० किलो पालाश आणि २५ किलो गंधक आवश्यक आहे. तर कापसाच्या संकरित जातीच्या लागवडीसाठी हेक्टरी १५० किलो नत्र, ७५ किलो स्फुरद, ४० किलो पालाश आणि २५ किलो गंधक लागते. उपलब्ध असल्यास ७ ते १० टन चांगले शिजलेले शेणखत हेक्टरी द्यावे.

बियाणे उपचार : पेरणीच्या वेळी, एक हेक्टरसाठी आवश्यक असलेले बियाणे ५०० ग्रॅम अझोस्पिरिलम आणि ५०० ग्रॅम पीएसबी मिसळले जाते. सह देखील उपचार केले जाऊ शकतात. त्यामुळे २० किलो नत्राची बचत होणार आहे. पेरणीनंतर स्तंभ पद्धतीने खत द्यावे. या पद्धतीमध्ये झाडाच्या परिघाभोवती १५ सेंमी खोल खड्डे तयार केले जातात आणि प्रत्येक झाडाला दिलेले खत त्यामध्ये टाकून मातीने बंद केले जाते.

# मेथी लागवड माहिती तंत्रज्ञान



दैनंदिन आहारामध्ये मेथी या पालेभाजीचा वापर तुम्ही केलाच असेल. मेथी पिक हे कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारे पीक आहे. मेथी हे पालेभाज्यातील महाराष्ट्रातील लोकप्रिय पालेभाजी आहे. दैनंदिन आहारात मेथीचा वापर आपल्या शरीरासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे या पिकाला वर्षभर चांगली मागणी असते. या पिकाची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो.

जमीनीची निवड : मेथी हे कमी कालावधीचे पीक आहे. त्यामुळे योग्य जमिनीची निवड आवश्यक आहे. मेथी पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते काळी आणि पाण्याचा योग्य जमीन लागते. चुनखडीच्या तसेच पाणी साठून राहणाऱ्या जमिनीत मेथी पीक चांगले येत नाही.

लागवडीचा हंगाम : मेथी या पिकाची लागवड वर्षभर करता येते. पावसाळ्यात, उन्हाळ्यात आणि थंडीच्या सुरुवातीलाही मेथी पिकाची लागवड करता येते आणि या काळात लागवड केलेल्या मेथीला बाजारभाव पण योग्य मिळतो. भाजीचा सतत पुरवठा होत राहावा यासाठी टप्प्या-टप्याने मेथी पिकाची लागवड करून वर्षभर मेथी पिकाची उपलब्धता करता येऊ शकते.

जमिनीची मशागत : लागवड करण्याआधी जमिनीची चांगली आडवी उभी नांगरट करून घ्यावी. नांगरणी नंतर रोटरच्या मदतीने जमीन भुसभुशीत करून घ्यावी.

लागवड अंतर : मेथी या पिकाची दोन प्रकारे लागवड करता येते.

मुख्य पीक म्हणून आणि आंतरपीक म्हणून. मुख्य पीक म्हणून लागवड करायची असल्यास तीन मिटर बाय दोन मीटर च्या सपाट वाफ्यामध्ये लागवड करतात. दोन ओळींमध्ये पंधरा ते वीस सेंटीमीटर चे अंतर ठेवून मेथीचे बी फेकून लागवड करतात. तसेच आंतरपीक म्हणून मेथी पिकाची लागवड करायची असल्यास मुख्य पिकातील मोकळ्या जागेत असणाऱ्या वीस ते तीन सेंटीमीटर जागेत लागवड करतात.

बियाणांचे प्रमाण आणि बीजप्रक्रिया : मेथी पिकाच्या मुख्य पीक म्हणून एक हेक्टर लागवडीसाठी पंचवीस ते तीन किलो बियाणे लागते. तसेच आंतरपीक घेताना आवश्यकतेनुसार बियाण्यांचे प्रमाण घ्यावे. बियाणे पेरताना एकसारखे आणि पातळ सोडावे. बिजप्रक्रिया करताना बुरशीनाशक ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बियाण्यास चोळावे.

सुधारित जाती : फुले कस्तुरी : फुले कस्तुरी हे वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे संशोधित करण्यात आले आहे. या वाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे या वाणाला जास्त फुटवे असतात आणि जास्त उत्पादन क्षमता आहे. हे वाण मर आणि नागअलीळा प्रतिकूल वाण आहे. या मेथीची उगवण लागवड केल्यावर सात ते आठ दिवसात होते. कस्तुरी सिलेक्शन : कस्तुरी सिलेक्शन हे वाण भारतीय कृषी संशोधन संस्था नवी दिल्ली येथे संशोधित करण्यात आले आहे. हे वाण खायला चविष्ट असते. या वाणाची पाने गोलाकार आणि हिरवी असतात. या वाणाची रोपे लहान आणि नाजूक असल्याने या वाणाला बाजारात चांगली मागणी असते. या मेथीची उगवण लागवड केल्यावर तीन ते चार दिवसात होते.

आंतर मशागत : कमी कालावधीचे पीक असल्याने मेथी पिकामध्ये जास्त आंतरमशागतीची गरज नसते. तण व्यवस्थापन करणे आवश्यक असते. लागवडीनंतर पंधरा ते वीस दिवसाच्या नंतर खुरपणी करून घ्यावी. मेथी पिकामध्ये तण वाढू देऊ नये.

खते आणि फवारणी : मेथी पिकाला सुरुवातीला २० किलो नत्र आणि नंतर खुरपणी झाल्यानंतर २० किलो नत्र हेक्टरी या प्रमाणात द्यावे. यामुळे पिकाची वाढ जोमदार होते. तसेच पेरणीनंतर वीस ते पंचवीस दिवसांनी दहा लिटर पाण्यात २०० ग्रॅम युरिया मिसळून त्याची फवारणी करावी .यामुळे उत्पादनात वाढ होते. मेथी या पिकावर जास्त रोगांचा पादुर्भाव होत नाही. या पिकावर प्रामुख्याने पाने खाणारी अळी (लीप मायनर) आणि मावा या किडींचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळतो. मावा किड काळ्या रंगाची असते. मावा कीड पानाच्या खालच्या भागावर आणि शेंड्यावरून मोठ्या प्रमाणात पानातील रस शोषून घेते. त्यामुळे रोपे खराब होऊन रोपांची प्रत खराब होते. पाने खाणारी ही पानावरील रस शोषून घेत वेडीवाकडी पुढे पुढे जाते. त्यामुळे पानावर पांढरया रंगाच्या वेड्यावाकड्या रेषा दिसतात आणि रोपाची प्रत खराब होते. किडीच्या नियंत्रणासाठी पीक लहान अवस्थेत असताना पिकावर निंबोळी अर्काची आणि डायमियोट ची फवारणी करावी.

पाणी व्यवस्थापन : मेथी पिकाला नियमित पाणी द्यावे . मेथी पिकाला पाण्याची जास्त आवश्यकता असते. मेथीचे चांगले उत्पन्न घेण्यासाठी आणि भाजीच्या दर्जेदार कॉलिटी साठी मेथी पिकाला चार ते पाच दिवसांनी पाणी द्यावे. मेथी पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. पिकाला पाण्याचा ताण पडल्यास पिकाची वाढ कमी होऊन उत्पादनावर परिणाम होतो. मेथी या पिकाचे योग्य नियोजन केले तर या पिकातून योग्य नफा मिळवता येतो.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३५० : नेपोटियानसने रोममध्ये घुसून स्वतःला सम्राट घोषित केले.
१०९८ : पहिली क्रुसेड आठ महिने चाललेल्या वेढ्यानंतर क्रुसेडरांनी ॲंटियोक शहर जिंकले.
१५३९ : एर्नान्दो दि सोतोने फ्लोरिडा स्पेनचा भाग असल्याचे जाहीर केले.
१६६५ : जेम्स स्टुअर्टने नेदरलँड्सच्या आरमाराला हरवले.
१८१८ : मराठेशाहीचा अस्त शेवटचे पेशवे बाजीराव हे मध्यप्रदेशातील असीरगढजवळ ढोलकोट येथे जनरल माल्कम याच्या स्वाधीन झाले आणि त्यांनी मराठी राज्य इंग्रजांच्या कडे सोपवले . नंतर इंग्रजानी शनिवार वाड्या वर कब्जा केला आणि तिथे युनियन जॅक फडकला
१८३१ : 'भारतीय महिला विद्यापीठ' या संस्थेची स्थापना. १९२० मध्ये 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ' (एस.एन.डी.टी.) असे नामांतर.
१८६४ : अमेरिकन यादवी युद्ध कोल्ड हार्बरची लढाई.
१८८९ : कॅनेडियन पॅसिफिक रेल्वेने कॅनडाचे दोन्ही तीर जोडले.
१९१५ : इंग्रज सरकारने रवींद्रनाथ टागोर यांना नाईटहुड ही पदवी बहाल केली.
१९१६ : महर्षी कर्वे यांनी भारतातील पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली.
१९३७ : ड्युक ऑफ विन्डसर व वॉली सिम्पसनचे लग्न.
१९४० : डंकर्कची लढाई जर्मनीचा विजय. दोस्त सैन्याने पळ काढला.
१९४० : दुसरे महायुद्ध जर्मन वायूदलाने पॅरिसवर बॉम्बवर्षाव केला.
१९४३ : झूट सुट दंगे लॉस एंजेल्स नेव्हल रिझर्व आर्मरीतील ६० लोकांच्या टोळक्याने हिस्पॅनिक दिसणार्या लोकांना बडवून काढले.
१९४७ : हिन्दूस्तानच्या फाळणीची मांउंटबॅटन योजना जाहीर झाली.
१९५० : मॉरिस हेझॉंग आणि लुईस लॅचेनल यांनी अन्नपूर्णा या ८,०९१ मीटर उंच असलेल्या शिखरावर प्रथमच यशस्वी चढाई केली.
१९६२ : एर फ्रांसचे बोईंग ७०७ प्रकारचे विमान पॅरिसहून निघताना कोसळले. १३० ठार.
१९६३ : नॉर्थवेस्ट एरलाइन्सचे डी.सी. ७ प्रकारचे विमान ब्रिटिश कोलंबियाच्या किनाऱ्याजवळ कोसळले. १०१ ठार.
१९६८ : ॲंडी वॉरहोल वर खूनी हल्ला.
१९६९ : व्हियेतनामजवळ ऑस्ट्रेलियाची विमानवाहू नौका एच.एम.ए.एस. मेलबॉर्न व अमेरिकेची विनाशिका यु.एस.एस. फ्रँक ई. एव्हान्सची टक्कर. एव्हान्सचे दोन तुकडे झाले.
१९७३ : सोवियेत संघाचेचे टी.यु. १४४ प्रकारचे विमान फ्रांसमध्ये गुसेनव्हिल जवळ कोसळले. १४ ठार.
१९७९ : मेक्सिकोच्या अखातात इहटॉक १ या खनिज तेलाच्या विहिरीला आग लागली. ६,००,००० टन तेल समुद्रात पसरले.
१९८४ : ऑपरेशन ब्ल्यु स्टार भारतीय सैन्याने आत घुसलेल्या अतिरक्यांना हुसकावण्यासाठी अमृतसरच्यासुवर्णमंदिरावर हल्ला चढवला.
१९८५ : भारत सरकारने पाच दिवसांच्या कार्यदिवस आठवड्याला सुरुवात केली.
१९८९ : थ्येनआनमन चौकात सात आठवडे तळ ठोकलेल्या प्रदर्शकांना घालवण्यासाठी चीनने लश्कर पाठवले.
१९९१ : जपानमधील माउंट उंझेन ज्वालामुखीचा उद्रेक. ४३ पत्रकार व संशोधकांचा मृत्यू.
१९९८ : जर्मनीमध्ये आय.सी.ई रेल्वेगाडी रुळांवरुन घसरली. १०१ ठार.
१९९८ : जमिनीवरील हवेतील लक्ष्यावर मारा करणाऱ्या त्रिशूल क्षेपणास्त्राची द्रोणाचार्य या युद्धनौकेवरून कोचीजवळ यशस्वी चाचणी झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४४ : प्रसिद्ध भारतीय पत्रकार, कादंबरीकार, नाटककार आणि निबंधकार व साहित्यिक बाळकृष्ण भट्ट यांचा जन्मदिन.
१८६५ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पाचवा) यांचा जन्म. (मृत्यू: २० जानेवारी १९३६)
१८६७ : भारतात बालविवाह नियंत्रण कायदा लागू करणारे प्रख्यात भारतीय शैक्षणिक, न्यायाधीश, आणि राजकारणी बिलास सारडा यांचा जन्मदिन.
१८९० : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक बाबूराव पेंटर यांचा जन्म (मृत्यू: १६ जानेवारी १९५४)
१८९० : खान अब्दुल गफारखान, सरहद्द गांधी. (मृत्यू: २० जानेवारी १९८८)
१८९२ : लेखिका तसेच बालसाहित्यिका आनंदीबाई शिर्के यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑक्टोबर १९८६)
१८९५ : चीन, इजिप्त आणि फ्रान्समधील राजदूत के.एम. पण्णीक्कर यांचा जन्म. (मृत्यू: १० डिसेंबर १९६३)
१९२४ : तामिळनाडूचे १५ वे मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांचा जन्म.
१९३० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी जॉर्ज फर्नांडिस यांचा जन्म.
१९४१ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती रुमा पाल यांचा जन्मदिन.
१९६६ : पाकिस्तानी क्रिकेट कप्तान जलदगती गोलंदाज वासिम अक्रम यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६५७ : मानवी शरीरातील रक्ताभिसरणाची क्रिया स्पष्ट करणारे इंग्लिश शरीरशास्त्रज्ञ विल्यम हार्वी यांचे निधन. (जन्म: १ एप्रिल १५७८)
१९३२ : उद्योगपती सर दोराबजी टाटा यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८५९)
१९५६ : स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार, राष्ट्रमत आणि स्वतंत्र हिन्दुस्तानचे संपादक, लेखक व नाटककार वामन गोपाळ तथा वीर वामनराव जोशी यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १८८१)
१९७७ : आर्चिबाल्ड विवियन हिल, नोबेल पारितोषिक विजेता ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ.
१९८९ : इराणी धर्मगुरू आणि राजकारणी रुहोलह खोमेनी यांचे रनिधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९०२)
१९९० : इंटेल कॉर्पोरेशन चे सहसंस्थापक रॉबर्ट नोयिस यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२७)
१९९७ : चित्रपट व नाट्य अभिनेत्री मीनाक्षी शिरोडकर यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९१६)
२००० : डॉ. आर.एस. अय्यंगार, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचे संचालक.
२०१० : अजय सरपोतदार, मराठी चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक.
२०१४ : भारतीय राजकारणी, महाराष्ट्राचे तिसरे उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर

# मतमोजणीची प्रक्रिया वस्तुनिष्ठपणे पार पाडावी : मतमोजणी निरीक्षक

बीड । प्रतिनिधी

मतमोजणीची प्रक्रिया वस्तुनिष्ठपणे पार पाडावी यासाठी योग्य ते प्रशिक्षण अधिनस्त कर्मचाऱ्यांना देण्याचे आवाहन मतमोजणी निवडणूक निरीक्षक बसवराज आर. सोमन्ना यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज मतमोजणी निवडणूक निरीक्षक बसवराज आर सोमन्ना जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण देण्यात आले त्यावेळी श्री आर सोमन्ना बोलत होते. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी मतमोजणी निरीक्षक श्री आर. सोमन्ना यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा आचारसंहिता कक्ष प्रमुख वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, पोस्टल बॅलेटचे सहाय्यक निवडणूक अधिकारी शैलेश सूर्यवंशी, गेवराई विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक अधिकारी ओमकार देशमुख मंचावर उपस्थित होते. माजलगाव, परळी, बीड, केज मतदार संघातील सहाय्यक



निवडणूक अधिकारी अतिरिक्त सहाय्यक निवडणूक अधिकारी प्रशिक्षण घेणारे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

श्री आर. सोमन्ना, म्हणाले मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली असून येत्या ४ जूनला मतमोजणी होणार आहे या मतमोजणीचे प्रशिक्षण यापूर्वी देण्यात आले असून प्रत्येक नेमलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी मतमोजणीची प्रक्रिया पार पाडताना अतिशय लक्षपूर्वक ती करावी. मतमोजणीच्या प्रक्रियेतील प्रत्येक फेरी मध्ये उमेदवारांकडून नेमण्यात आलेल्या प्रतिनिधींचे समाधान होईपर्यंत पुढे जाऊ नये. लिहिण्यात येणारी मतमोजणीची संख्या ही सुपरवायझर, सहाय्यक तसेच सूक्ष्म निरीक्षक आणि उमेदवार यांच्या प्रतिनिधींनी बघितल्यानंतरच लिहावी. सहाय्यक निवडणूक अधिकारी यांनी त्यांच्या विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्राच्या फेरीची मतमोजणी झाल्यानंतर संगणकाद्वारे देण्यात येणारी माहिती ही परिपूर्ण योग्य असल्याची खात्री करूनच ती स्वतः लिहून जिल्हा निवडणूक अधिकारी यांना सादर करावी. बीड मतदारसंघात ४१ उमेदवार आणि एक नोटा असे ४२ ची यादी असल्याने मतमोजणीला थोडा वेळ लागणार आहे. परंतु तरी देखील ही मतमोजणी लक्षपूर्वक आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने पार पाडणे हे प्रत्येक नेमलेल्या अधिकाऱ्यांचे कर्तव्य असून त्यांनी त्याची कर्तव्याची जाणीव ठेवून ही प्रक्रिया पार पाडावी. मतमोजणीच्या प्रक्रियेत नेमलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बाहेर जाता येणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने तसे नियोजन ठेवून काम करणे आहे. यासह मतमोजणी दरम्यान कोणाकडे मोबाईल राहणार नाही. मतमोजणी दरम्यान निवडणूक आयोगाकडून देण्यात आलेले तक्ते हे नीट सुवाच्च इंग्रजी अक्षरात लिहिणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. निवडणूक आयोगाकडून नेमण्यात आलेले मतमोजणी निरीक्षक हे प्रत्येक फेरीतील कुठल्याही दोन कंट्रोल युनिटची तपासणी सूक्ष्म निरीक्षकांच्या माध्यमातून करतील. मतमोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी केलेली तपासणी आणि मतमोजणी निरीक्षकाकडून झालेल्या तपासणीमध्ये एक वाक्यता असायला हवी. यात तफावत आढळल्यास ताबडतोब सदर कर्मचारी बदलून घेतला जाईल व त्या कर्मचाऱ्यांवर निवडणूक आयोगाने दिलेल्या कलमानुसार कारवाई करण्यात येईल. यासह एकूण मतमोजणी झाल्यानंतर प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील किमान पाच व्हीव्हीपॅट मशीनची मतमोजणी केली जाईल. ही मतमोजणी कशी असावी याबाबत आज प्रशिक्षण देण्यात आले.

व्हीव्हीपॅट मशीन मधून सर्व चिठ्ठ्या काढून ही चिठ्ठी ज्या उमेदवाराच्या अनुक्रमांकाची असेल त्या पिजन बॉक्स मध्ये उमेदवारांचे प्रतिनिधी यांना समक्ष दाखवून जोराने बोलून ठेवावी. यात आधी पिजन बॉक्समध्ये मार्क केलेले नंबर नीट पहावे आणि त्याप्रमाणे त्या त्या बॉक्समध्ये पडलेल्या मतदानाची स्लिप टाकावी. शेवटी त्याची मोजणी करावी या प्रक्रियेमध्ये गल्लत करता कामा नये अगदी शांतपणे ही प्रक्रिया पार पाडावी. ही सर्व प्रक्रिया व्हिडिओ ग्राफीमध्ये रेकॉर्ड होणार असून ती निवडणूक आयोगाकडे सादर केली जाईल. मतमोजणीची प्रक्रिया पार पडत असताना विधानसभा निहाय नेमलेल्या सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांनी ती वस्तुनिष्ठ पद्धतीने नेमकी होत आहे का याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. तसेच एकूण मतमोजणीची संख्या स्वतः लिहावी, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी यावेळी दिले. व्हीव्हीपॅट मधील पर्चीची मोजणी कशी करावी याबाबतचे प्रशिक्षण केज चे सहाय्यक निवडणूक अधिकारी दीपक वजाळे यांनी दिले. नाथापूर रोडवरील शासकीय तंत्रनिकेतन येथे मतमोजणीची प्रक्रिया पार पाडली जाणार असून या ठिकाणी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था आहे. मतमोजणी अधिकारी कर्मचाऱ्यांना कोणत्याही कारणावरून या इमारतीच्या बाहेर जाता येणार नाही त्यांना लागणाऱ्या खाण्यापिण्याचे पदार्थ हे जिल्हा प्रशासनाच्या वतीने पुरवण्यात आले असून या ठिकाणी आरोग्य विषयी समस्या उद्भवल्यास त्यासाठी आरोग्य विभागाने ही योग्य ते नियोजन केले आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केल्यानंतर मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण झाली असल्याचे सांगण्यात येईल.

## विद्यार्थ्यांनी दहावी-बारावीच्या यशाने हुरळून न जाता प्रगती करावी -कानगावकर

### भावसार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



वडवणी । प्रतिनिधी

नुकताच दहावी-बारावी परीक्षांचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये बीड जिल्ह्यातील भावसार समाजातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. परंतु या यशाला हुरळून न जाता आपार मेहन घेवून भविष्यात चांगली प्रगती करून आपले आई-वडील, गुरूजन व देशाच्या नावाचा लौकिक वाढवावा असे प्रतिपादन बीड जिल्हा भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर यांनी केले. आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत आपला वाढदिवसाच्या निमित्ताने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करत. गुणवंतांच्या पाठीवर शब्बासकीची थाप पडावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी बीड जिल्हा भावसार समाजाच्यावतीने गुणवंतांच्या घरी जावून त्यांच्या पालकांसह सत्कार केला . गेल्या पंधरा वर्षापासून ही परंपरा भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगांवकर राबवत आहेत.

वडवणी येथील कार्यक्रमास ह.भ.प. माऊली महाराज बेदरकर, यांची प्रमुख उपस्थिती होती. येथील कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रकाशराव कानगावकर म्हणाले की, दहावी-बारावीच्या यशाने हुरळून न जाता भविष्यात अपार मेहनत घेऊन उच्च शिक्षण घेऊन नीट, जेईई, स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करून यशाचे मोठे मोठे शिखर पादाक्रांत करून स्वतःसह आई वडिलांचे स्वप्न साकार करत समाजाचे नाव देशात नावलौकिक करावे असे त्यांनी सांगितले. तर ह.भ.प. माऊली महाराज बेदरकर म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गो-गरीब-श्रीमंत लहान-थोर यांच्या सुखा दुखात सामील होणारे प्रकाशराव कानगांवकर यांच्यासारखे सारखे जिल्हाध्यक्ष भावसार समाजास लाभले हे आपले भाग्य असून गुणवंतांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप टाकण्यासाठी ते प्रत्येक गुणवंताच्या घरी जावून त्यांच्या पालकांचाही सत्कार करतात असा अनोखा उपक्रम ते राबवतात. त्यांच्या या उपक्रमामुळे गुणवंतांमध्येही सकारात्मक उर्जा निर्माण होते असे मौलिक विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी झालेल्या कार्यक्रमास मनोज गार्डी , तालुकाध्यक्ष तथा सहसचिव महेश सदरे, विक्रम गार्डी, रमेश सदरे, कल्याण किर्तने , प्रकाश गार्डी सुधाकर लांडे, मंगेश गार्डी, प्रकाश पतंगे,, सह पालक, महिला, गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर माजलगाव येथे झालेल्या कार्यक्रमास श्रीराम कलस्कर ,रामा कुटे , कैलास येलसटटे,डींगाबर गरूड, सतिश गरुड, संकेत कलस्कर, रामा खेडकर सुनील पुरबुज सह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी झालेल्या कार्यक्रमात अनेक गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनींनचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज गार्डी यांनी केले तर आभार विक्रम गार्डी यांनी मानले.

## पापासिंह विद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

धारूर । प्रतिनिधी

धारुर शहरातील म शी प्र चे हु.पापासिंह माध्यमीट विद्यालयातील दहावी शालांत परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्याचा गुणवंत विद्यार्थ्याचा गुणगौरव सोहळा मान्यवराचे उपस्थीतीत नचटताच संपन्न झाला यशस्वी विद्यार्थी चे शाळेचे सर्वानी कौतूक केले

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलित हुतात्मा पापासिंह माध्यमिक विद्यालय, किल्लेधारूर शाळेत गुणवंत विद्यार्थी व पालकांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२४ चा उत्कृष्ट निकाल लागला असून शाळेचा निकाल ९८.६१% लागलेला आहे.



अदिश्री तुकाराम मुंढे ९६.६०% प्रथम क्रमांक येण्याचा मान धारूर तालुक्यातून मिळाला. ज्ञानेश्वरी गोरख राऊत ९५.००%द्वितीय अस्मिता अमोल पिलाजी ९३.८०% तृतीय त्यानिमित्त शाळेतील सर्व गुणवंत विद्यार्थी व पालकांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाला लाभलेले अध्यक्ष म्हणून शालेय समिती सदस्य अजयसिंह दिख्खत प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले .प्रमोदकुमार तिवारी शालेय समिती सदस्य प्रमुख मार्गदर्शक डॉ.जी. के काकडे प्राचार्य राजमाता जिजाऊ महाविद्यालय किल्लेधारूर कार्यक्रमाचे आयोजक मुख्याध्यापक बालासाहेब सोळंके या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने माता पालक विद्यार्थी यांची उपस्थिती लक्षणीय होती या कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक सोळंके बी.एस यांनी केले या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून लाभलेले जेष्ठ पत्रकार अनिल महाजन व डॉ. काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले यानंतर विद्यार्थी व पालक यांनी आपले मनोगत व्यक्त केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. अशा रीतीने कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला

## अनुदानित युरिया खताची चोरून विक्री करणाऱ्याला सरकारचे अभय का- मुंडे

परळी । प्रतिनिधी

शेतकऱ्याला प्रत्येक वर्षी पेरणीसाठी युरिया खताची गरज मोठ्या प्रमाणावर लागते. परंतु पेरणीच्या वेळेसच अनुदानित युरिया खताची टंचाई निर्माण होते कारण अनेक खाजगी कंपन्या चोरून अनुदानित युरिया खताचा पुरवठा खाजगी उद्योगांना पुरवतात, त्यांचे मंत्रालया पासून कृषी खात्याच्या वरिष्ठांशी आर्थिक व्यवहाराचे लागेबंध असल्यामुळे युरिया खताची टंचाई निर्माण करून शेतकऱ्याला युरिया न मिळवून देणारे मोठे सोनेरी टोळक्याचे हात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. केंद्र सरकारच्या निदर्शनास युरिया खताची चोरी होते असे लक्षात आल्यावर तात्काळ भारत सरकारच्या रसायने, खते मंत्रालयाकडून सर्व राज्य सरकारला आदेश पारित केले परंतु महाराष्ट्र राज्यातील कृषी विभागाच्या निविष्ठा गुण नियंत्रण दक्षता पथकाकडून राजकीय हस्तक्षेपा मुळे कारवाई केली जात नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . १० लाख टन युरिया चा वापर चोरून खाजगी उद्योग प्लाऊड,मोल्डिंग, पावडर ,पशुखाद्य ,दुग्ध व्यवसाय, काँक्रिटीकरण व औद्योगिक खाणींचे स्फोटके तयार करण्यासाठी युरियाचा वापर केला जातो. महाराष्ट्रामध्ये अनुदानित युरिया खताचा खूप मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असून सर्व स्तरावर आर्थिक व्यवहाराचे लागे बंद असल्यामुळे कृषी विभागाचे अकार्यक्षम निविष्ठा गुण नियंत्रण दक्षता पथकाकडून कारवाई केली जात नाही. युरिया खताचा काळाबाजार व शेतीव्यतिरिक्त इतर औद्योगिक कामासाठी वापर केला जातो असे केंद्र सरकारच्या निदर्शनास दिनांक १०/२/२०२३ ला माहिती मिळताच युरिया खताचे तस्करी रोखण्यासाठी विविध औद्योगिक अकृर्षक उद्योगाची माहिती घेऊन सखोल चौकशी करून दोषीशी उत्पादक व पुरवठा करणाऱ्या यंत्रणेवर खत नियंत्रण आदेश १९८५ व जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वे तात्काळ कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश केंद्र सरकारकडून राज्य सरकारला पारित केले असून ही त्रिमूर्ती अकार्यक्षम राज्य सरकारकडून आज तागायत गांभीर्याने कारवाई केली जात नसल्याचा आरोप काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.

## ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात बालसंस्कार शिबिर उद्घाटन समारंभ



धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरातील ज्ञानदीप विद्यालय व बालसंस्कार केंद्र येथे एक जून ते चंदा जुन या कालावधीत होणा-या संस्कार शिबिराचे उदघाटन उत्साहात करण्यात आले. किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बाल संस्कार केंद्र किल्ले धारूर या ठिकाणी एक जून ते १४ जून या कालावधीमध्ये बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजी अंडील, केंद्रप्रमुख सय्यद हकीम, केंद्रप्रमुख शदत्तात्रय कोकणे , यांचे हस्ते करण्यात आले या वेळी हस्ताक्षर व चित्रकला प्रशिक्षक अर्जून भालेराव विद्यालयाचे मुख्याध्यापक एस एस शेख हे उपस्थित होते. या वेळी केंद्रप्रमुख सय्यद हाकिम यांनी मार्गदर्शन हि केले

या संस्कार शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ते बरोबर कलागुणांना वाव मिळावा शारीरिक विकास व्हावा आरोग्य संपन्न व्हावे विद्यार्थ्यांवर संस्कार घडावे या उद्देशाने योगासने, प्राणायाम, चित्रकला, हस्तकला, हस्ताक्षर लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा अशा अनेक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभार शिक्षक मुंजाराम निरडे प्रस्ताविक सचिन चव्हाण यांनी केले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

# स्मशानभूमीचे काम रखडल्याने उघड्यावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ

### लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाला गांभीर्य नाही

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे जुन्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन बांधकाम कोसळल्याने व पत्रे उडून गेल्याने नविन स्मशानभूमी बांधकाम करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली स्मशानभूमी मध्ये सरण रचुन त्यावर ठिय्या आंदोलन करण्यात आले होते.त्यानंतर आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक (दहन/दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजने अंतर्गत मुलभुत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षांकरिता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपये मंजूर करत दि.३१ मार्च २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती.मात्र त्यांच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या हलगर्जीपणामुळे वर्षभरापासून काम रखडलेल्या अवस्थेत असुन आज दि.२ रविवार रोजी पहाटे लिंबागणेश येथील भीमा विठ्ठल भोजणे यांचे दिर्घ आजाराने निधन झाले.त्यांचा अंत्यविधी गावच्या सार्वजनिक स्मशानभूमीमध्ये उघड्यावर अंत्यसंस्कार करावा लागला.पावसाळा सुरू होणार असल्याने पावसाळ्यात स्मशानभूमी अभावी मृतदेहाची हेळसांड होणार असुन लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाला यांचे





गांभीर्य नसल्याने ग्रामस्थांमध्ये तिव्र नाराजी दिसून येत आहे.

लिंबागणेश येथील लगडलेल्या स्मशानभूमीचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी तातडीने करण्यात यावे यासाठी दि.२४ मे रोजी डॉ.गणेश ढवळे यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रां.पं.) जिल्हा परिषद बीड डॉ.ज्ञानोबा मोकाटे यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनानंतर दि.२७ मे रोजी डॉ.मोकाटे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड अनिरूद्ध सानप यांना लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे रखडलेल्या काम प्रकरणात तातडीने संबंधितांना नोटीस पाठवुन तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत असुन अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असून अंत्यसंस्कार दरम्यान काही गावांमध्ये ग्रामस्थांमध्ये वादविवाद होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याच्या घटना दुर्दैवाने घडत आहेत. नुकतेच बीड तालुक्यातील पालवण येथे गेल्या महिन्यात मागासवर्गीय व्यक्तीचा अंत्यसंस्कार करण्याच्या वादानंतर अट्रासिटीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. याविषयी लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाला गांभीर्य नसल्याचे दिसून येते.

## धारूर बाजार समितीचा स्तुत्य उपक्रम; पाच रुपयात वीस लिटर पाणी

धारूर /प्रतिनिधी

धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड च्या आवारामध्ये शुद्ध, स्वच्छ व थंड पाण्यचा आरो प्युरिफायर वॉटर प्लांट उभा केला आहे या प्लांट मधून फक्त पाच रुपयांमध्ये परिसरातील व्यापारी नागरिक यांना वीस लिटर शुद्ध पाणी दररोज सुरळीत वितरित केले जाते. दिवसाला हजारो लिटर पाणी आरो प्लांट मधून नागरिक व्यापारी व छोटे व्यावसायिक यांना पिण्यासाठी उपलब्ध असते.

शुद्ध, स्वच्छ व थंड पाणी बाजारात विकत घेण्यासाठी वीस रुपये प्रति लिटर ने घ्यावे लागते या महागाईच्या काळात कृषी उत्पन्न बाजार समितीने सामाजिक दायित्व म्हणून कमी पैशात मुबलक पाणी उपलब्ध व्हावे म्हणून २ जून २०२३ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती चे छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड परिसरात आरो वॉटर प्युरिफायर प्लांट उभा केला आहे या प्लांट मधून व्यापाऱ्यांच्या व नागरिकांना फक्त पाच रुपयांमध्ये वीस लिटर शुद्ध , थंड , स्वच्छ पाणी वितरित केले जाते या आरो प्लांट मधून पाणी शुद्ध केल्यानंतर वाया जाणाऱ्या पाण्यावर झाडांची जोपासना केली.

आज घडीला दहा ते बारा फूट उंच मोठी झाडे झाली आहेत आरो वॉटर




प्युरिफायर प्लांट उभा करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने विशेष प्रयत्न करून गेल्या वर्षी २ जून २०२३ रोजी हा प्लांट बसवला आज बाजार समितीतील,आडत व्यापरी दुकानदार, छोटे व्यवसायिक, नागरिक व शेतकऱ्यांना भर उन्हाळ्यात शुद्ध , स्वच्छ व थंड पाणी मिळाल्यामुळे समाधान व्यक्त केले जात आहे बाजार समितीच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# बुवा-बाबाच्या नादाला लागुन स्वत:चा सत्यानाश करून घेऊ नका -सत्यपाल महाराज

बीड । प्रतिनिधी

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंती निमित्त भारतीय शेतकरी कामगार पक्ष आयोजित व गंगाई सामाजिक प्रतिष्ठान संयोजित शिदोड येथे समाज प्रबोधनकार सुप्रसिद्ध किर्तनकार, सप्त खंजिरीवादक सत्यपाल महाराज यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्यक्रमाने साजरी करण्यात आली.



सदर कार्यक्रमास प्रबोधनपर मार्गदर्शन करताना सत्यपाल महाराज म्हणत होते कि अनिष्ट रुढी परंपरा कर्मकांड बुवा-बाबांच्या नादी लागून स्वत:चा व स्वतच्या संसाराचा सत्यानाश करुन घेऊ नका, देवा नवसाच्या नावाखाली पशु पक्षांचे बळी देऊन हत्या करून नका हि हात जोडून कळकळीची विनंती करुन भावनिक साद घातली.

रयतेसाठीचे लोककल्याणकारी सुराज्य ही छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण होळकरशाहीने पुढे मोठ्या नेटाने टिकवली, वाढवली,जनहिताची व लोकोपयोगी अनेक कामे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी राबविली.

गंगाई सामाजिक प्रतिष्ठान मार्फत शिदोड येथे कोरोना काळ वगळता सालाबाद प्रमाणे वैचारिक प्रबोधनात्मक जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास माजी मंत्री सुरेश नवले शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा ज्योती मेटे मॅडम, जेष्ठ पुरोगामी नेत्या, प्रा. सुशिला मोराळे, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णूपंत घोलप, शेकाप माजलगांव तालुका चिटणीस भाई लहुराव साळुंखे, मल्हार सेना महिला आघाडीच्या मिना देवकाते, गेवराई शेकाप तालुका चिटणीस भाई वाल्मिक कदम, शेकाप पैठण तालुका चिटणीस भाई चंद्रशेखर सरोदे, गेवराई पुरोगामी विचार मंचचे संजय येवले, शेकाप बीड तालुका चिटणीस अँड. भाई राजेंद्र नवले, धनगर समाजाचे सामाजिक अभ्यासक कचरू चांभारे सर, संविधान अभ्यासक मिथुन जोंगदड ,मुकेश गाडेकर, जय मल्हार युवा सेनेचे नेते अँड राजेंद्र शिंदे, ओबीसी सामाजीक कार्यकर्ते मदने रमेशराव,नारायण धापसे, एकनाथ ढोरमारे शिदोड गांवचे सरपंच तोडकर उपसरपंच रणजित कदम, युवा नेते अमर वाघमोडे, पत्रकार अंकुश गवळी, प्रा.संदीप गांडगे, प्रा.शंकर घाडगे सर,गणेश कदम, पांडुरंग शेंडगे , ऍड राजेश शिंदे, ऍड वडमारे, रासपा चे काकासाहेब कानडे, यांच्यासह गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ, महिला व युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा नितीन गायकवाड बीड जिल्हा युवक काँग्रेसचे सरचिटणीस प्रा. दत्तात्रय प्रभाळे यांनी विशेष परिश्रम घेतले

या कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती कमेटी सदस्य भाई आकाश निर्मळ यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानले.

## मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनीकाच्या विरपत्नीचा गौरव



किल्लेधारूर । प्रतिनिधी

मरावाडा मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र्य सैनानी स्व नरहरी औसेकर ( काशीद यांच्या वीर पत्नी कुसूमबाई औसेकर या धारूर शहरात आल्या असता आपले पतीच्या अनेक ऐतीहासीक आठवणीणा उजाळा दिला यावेळी त्यांचा सत्कार मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याच्या अमृत मोहत्सवी वर्षा निमित्त राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार पक्षाचे पेन्शनर्स आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रा ईश्वर मुंडे यानी त्यांचा गौरव केला.

मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील हु.काशिनथराव चिंचाळकर यांचे समवेत सतत असणारे ते हुतात्मा झाले त्या दिवशी तेथून हु.काशीनाथराव चिंचाळकर यांचे हट्टा मुळे तेथून जाऊं भारतसरकारचे रणगाडे या भागात घेऊन येऊन मराठवाडा मुक्तीसंग्रामात महत्वाची भुमिका बजावणारे स्वा.सै. स्व. नरहरीराव औसेकर (काशिद) यांच्या पत्नी स्वातंत्र्य सैनानी कुसुमबाई औसेकर यांना भेटून त्यांचा सत्कार करताना राष्ट्रवादी कांग्रेस पेन्शनर्स आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रा ईश्वरजी मुंडे, संभाजीनगर विभागीय पत्रकार अधिस्विकृती समिती सदस्य अनिल महाजन यावेळी त्याचे अनुभव ◀◀ पान ३ वर

## दहावी परीक्षेतील गुणवंत उत्कर्षा जाधवचा 'आरोग्यदूत'तर्फे सन्मान

बीड । प्रतिनिधी

येथील श्री.शिवाजी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.उत्कर्षा जाधवने दहावी बोर्ड परीक्षेत ९९.८० टक्के गुण घेऊन नेत्रदीपक यश संपादन केले आहे. उत्कर्षाच्या या यशाबद्दल 'लोककल्याणकारी आरोग्यदूत'च्या वतीने तीचा यथोचित गौरव करण्यात आला.

कु.उत्कर्षा ज्ञानेश्वर जाधवने शालांत परीक्षेत ५०० पैकी ४९९ गुण संपादन करून (९९.८०%) अक्षरश: गगनाला गवसणी घातली आहे. त्याअनुषंगाने आरोग्यदूत टीमच्या वतीने संपादक बाबा देशमाने, सहसंपादक भगीरथ तोडकरी, शिवसेना वैद्यकीय ◀◀ पान ३ वर



### आरोग्यसेवक बाजीराव चव्हाण यांच्याकडून अभिनंदन!

संपूर्ण महाराष्ट्रात आरोग्यसेवक म्हणून नावलौकिक प्राप्त धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्यमंत्री महोदयांचे विश्वासू बाजीरावजी चव्हाण यांनीही उत्कर्षा जाधवचे अभिनंदन करून कौतुक केले. इयत्ता दहावीच्या निकालापूर्वीच लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात झालेल्या स्क्रीनिंग परीक्षेत उत्कर्षाची (मेडिकल) बॅचसाठी निवड झाली आहे. आपल्या नेत्रदीपक अशा यशाचे गुरूजन आणि वडील डॉ.ज्ञानेश्वर जाधव, आई सुनंदा जाधव यांना श्रेय दिले आहे. गुणवंत उत्कर्षाचे धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाजीराव चव्हाण यांनी पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## संतोष डावकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौज येथील मूळ रहिवासी संतोष डावकर यांचे रविवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ४३ वर्षाचे होते.



संतोष ज्ञानोबा डावकर ह.मु. बीड हे गेल्या काही दिवसापासून आजारी होते. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांचे दि.२-६-२०२४ रोजी पहाटे एकच्या दरम्यान दु:खद निधन झाले. त्यांच्यावर बार्शी रोड नजीकच्या स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

## ग्रामसेवकांनी आपण सरकारी कर्मचारी आहोत आणि सरपंचांनी जनतेचे सेवक आहोत हे विसरू नये

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील वडगाव (गुंधा ) येथील शिवाजी महाराज चौक व शेजारील बुद्ध विहार परिसरात नालीत व रोडवर कचऱ्याचे ढीग पडले आहेत. सरपंच व ग्रामसेवक यांना सूचना देऊनही त्यांनी कचरा हटवला नाही. तसेच शैलेश डोंगरदिवे यांनी दिनांक ६ फेब्रुवारी २०२४ रोजी लेखी निवेदन देऊन सुद्धा कचरा हटवला नाही . ऑनलाइन तक्रारीनंतर वडगाव ,(गुंदा) गावचे सरपंच व ग्रामसेवक यांनी लेखी आश्वासन दिले आम्ही कचरा उचलून टाकू तरीपण त्यांनी कचरा उचलून टाकला नाही. या ठिकानी शिवाजी महाराज चौक व बुद्धविहार असून येथे घाणीचे साम्राज्य तयार झाले आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली असून त्यामुळे अनेकांना आरोग्याचा त्रास जाणवत आहे. त्या ठिकाणी असलेला कचरा प्लास्टिक खाल्ल्यामुळे अनेक जनावरांनाचा जीव गेला आहे.शेवटी शैलेश डोंगरदिवे ग्रामपंचायत कार्यालय निष्काळजी पणामुळे दिनांक ३ जून रोजी उपोषणाला बसणार आहे. असे लेखी निवेदन ग्रामसेवक तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांनाही निवेदन दिले असून उपोषणाला बसणार आहे.





## नागरीकांनी प्रसार माध्यमांचा चुकीचा वापर टाळावा पाटोदा पोलिसांचे नागरिकांना आवाहन

पाटोदा । प्रतीनिधी

दिनांक ४ जून २०२४ रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणूक मतमोजणी अनुषंगाने पोलीस ठाणे पाटोदा हद्दीतील मौजे सौताडा आणि वाघिरा या गावांमध्ये माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री धाराशिवकर साहेब, पोलीस स्टेशन पाटोदा चे प्रभारी अधिकारी श्री अनमोल केदार यांनी सौताडा व वाघिरा गावामध्ये शांतता कमिटी चे सदस्य, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांची शांतता बैठक घेऊन लोकसभा निवडणूक मतमोजणीच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी शांतता राखावी.. प्रसार माध्यमांचा चुकीचा वापर करू नये.



व्हाट्सअप ग्रुप वरती तसेच फेसबुक पेज वरती आक्षेपार्ह पोस्ट करू नये.. कोणत्याही जातीबद्दल किंवा धर्माबद्दल आक्षेपार्ह विधान किंवा फोटो पोस्ट करू नये. जो कुणी अशा प्रकारचे कृत्य करेल त्यावर प्रशासन गुन्हे दाखल करून कडक कायदेशीर कारवाई करणार आहे. याबाबत योग्य त्या सूचना दिल्या...

तसेच यापूर्वी निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहिता लागल्यानंतर ज्या इसमानी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केली, तसेच ज्याने ती प्रसारित केली व ज्या व्हाट्स अप ग्रुप वर प्रसारित झाली त्या२ ग्रुप अडमीन वर देखील कडक कायदेशीर कारवाई पाटोदा पोलिसांनी केली आहे. यापुढे देखील जो कोणी इसम हा सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करेल त्याचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करणार असल्याचे माननीय उपविभागीय पोलीस अधिकार साहेब यांनी बैठकीत सांगितले..

बैठकीत सूचित केलेप्रमाणे विविध गावात विविध व्हाट्सअप मधील ग्रुप ॲडमीनवर कारवाई ◀◀ पान ३ वर

## दहा जून रोजी वाढदिवस साजरा करणार -अनिलदादा जगताप

बीड । प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांचा येत्या ४ जून रोजी असणारा वाढदिवस काही कारणास्तव सोमवारी दि. १० जून २०२४ रोजी साजरा करणार असल्याची माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यलयातून देण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांची लोकप्रियता प्रचंड प्रमाणात असून दरवर्षी अनिलदादा यांचा वाढदिवस शिवसैनिक मोठ्या जल्लोषात आणि आनंदात साजरा करतात. मात्र यावर्षी ३ जून रोजी अनिलदादा जगताप यांना महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे बैठकीसाठी मुंबई येथे उपस्थित राहायचे आहे. याबरोबरच दि. ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे. यामुळे अनिलदादा जगताप यांचा ४ जून रोजी असणारा वाढदिवस सोमवारी दि. १० जून २०२४ रोजी साजरा करण्यात येईल व तिथून पुढे बीड जिल्ह्यात अनिलदादा यांच्या वाढदिवसा निमित्त घेण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रम कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन शिवसेना मध्यवर्ती कार्यलयातून करण्यात आले आहे.



## मतमोजणी निरीक्षकाने केली स्ट्राँग रूमची पाहणी

बीड । प्रतिनिधी

नाथापूर रोडवरील शासकीय तंत्रनिकेतन येथे असणाऱ्या स्ट्राँग रूमची मतमोजणी निरीक्षक बसवराज आर सोमन्ना यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्यासह पाहणी केली. मंगळवार दिनांक ४ जून रोजी सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीची मतमोजणी होणार असून ३९ बीड लोकसभा मतदार संघाचे स्ट्राँग रूम शासकीय तंत्रनिकेतन येथे असून या ठिकाणी करण्यात आलेली व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी मतमोजणी निरीक्षक बसवराज आर सोमन्ना यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यासह केली.





या ठिकाणी तयार करण्यात आलेले केज, बीड, माजलगाव, परळी, गेवराई, आष्टी सहा विधानसभा मतदार क्षेत्रातील स्ट्राँग रूम आणि मतमोजणी कक्षात मतमोजणीसाठी लावण्यात आलेली व्यवस्थेची पाहणी केली. मतमोजणीच्या वेळी या कक्षात सहाय्यक निवडणूक अधिकारी, सुपरवायझर, सहाय्यक सूक्ष्म निरीक्षक, शिपाई, उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील. या ठिकाणी टपाली मतदानाची ही मतमोजणी होणार असून यासाठी स्वतंत्र कक्ष राहणार आहे. टपाली मतदानाअंतर्गत ८० वर्षापेक्षा अधिक आणि दिव्यांगाचे झालेले गृह मतदान, सुविधा केंद्रामध्ये झालेले मतदान तसेच सर्विस वोटर यांचे झालेले मतदान असे एकूण मतदान टपाली मतदाना अंतर्गत येत असून यांची मतमोजणी ०४ जुनला सकाळी आठ वाजेपासून सुरू होणार आहे. या कक्षात असणाऱ्या सुविधांचा आढावा मतमोजणी निरीक्षकाने घेतला. या इमारतीमध्ये निवडणूक निरीक्षक, मतमोजणी निरीक्षक आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेही कक्ष असतील. नियंत्रण कक्षातून सीसीटीव्ही माध्यमाच्याद्वारे मतमोजणी प्रक्रियेची पाहणी केली जाईल. या इमारतीत आरोग्य विषयी समस्या निर्माण झाल्यास आपातकालीन दवाखाना तयार करण्यात आला आहे. इमारतीच्या बाहेरील परिसरात मीडिया कक्ष उभारला असून यामध्ये मोठ्या स्क्रीनच्या माध्यमातून मतमोजणीची प्रक्रिया दाखवण्यात येईल. तसेच माध्यम प्रतिनिधींना मोबाईल, लॅपटॉप, बॅटरी बॅकअप करण्यासाठी चार्जिंगची सुविधा उपलब्ध असेल. या कक्षाची निवडणूक निरीक्षकांकडून पाहणी केली. आवश्यक ठराविक अधिकाऱ्यांना सोडून कुणालाही मतमोजणी कक्षात मोबाईलची परवानगी दिलेली जाणार नाही.

## बियाणे चढ्या दराने विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल करणार -राजेंद्र आमटे

### कृषी विभागाने व्यापाऱ्यांकडे आलेल्या बियाणांची यादी प्रसिद्ध

बीड । प्रतिनिधी

शेतकरी दुष्काळाने होरपळला आहे.सरकारने शेतकऱ्याच्या मालाला भाव तर दिलाच नाही आणि आत्ता पेरणीच्या दिवसात लालची व्यापारी बियाणांची कृत्रिम टंचाई निर्माण करून बियाणे चढ्या भावाने विक्री केली जाते हे शिवसंग्राम शेतकरी आघाडी खपून घेणार नाही कृषी अधिकारी यांनी बीड जिल्हा मध्ये कोणत्या कंपनीचे किती बियाणे कोणत्या व्यापाऱ्याकडे आले आहे याची यादी प्रसिद्ध करावी जो व्यापारी बियाणे शासनाच्या एम आर पी पेक्षा जास्तीच्या भावाने विक्री करत असेल तर शिवसंग्राम शेतकरी आघाडीला संपर्क साधावा अशा लालची व्यापाऱ्याची गय केली जाणार नाही त्यांच्यावर फौजादरी गुन्हे दाखल करून परवाने रद्द करण्यात यावे शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने शेतकऱ्यांना विनंती करण्यात येते की बोगस बी बियाणे, बोगस खते, अथवा साठे बाजार करून कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या, जास्तीच्या चढ्या भावाने विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याची माहिती शिवसंग्राम शेतकरी आघाडी यांना देण्यात यावी माहिती देणाऱ्याचे नाव गुपित ठेवण्यात येईल आम्ही तत्काळ व्यापाऱ्यांचा परवाना रद्द करण्यासाठी व त्यांच्या वर फौजदरी गुन्हा दाखल करून असे आव्हान शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे ९६६५५६१३३३, प्रा जाधव सर ९४०३९२७९९९ तालुका अध्यक्ष नवनाथ प्रभाळे ९७६३१७६९९९ बीड पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे ९६२३७१३३३३, शिवसंग्राम सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे ९५४५३०९७०७



यांना संपर्क साधावा तसेच जिल्हा कृषी अधिकारी जेजुरकर ९४०५० ०२८०० यांना संपर्क साधावा हि सर्व शेतकरी बांधवांना कळकळीची विनंती करण्यात येते आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आयुक्तांकडून नालेसफाईची पाहणी; उर्वरित कामे पावसाळापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना

**पिंपरी । प्रतिनिधी**

शहरातील छोट्या व मोठ्या नाल्याच्या साफसफाई कामाची पाहणी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी शनिवारी (दि.१) केली. उर्वरित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा. पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात शिरणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकार्यांना दिल्या आहेत.

या वेळी सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य अभियंता रामदास तांबे, उपायुक्त राजेश आगळे, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, सीताराम बहुरे, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त



यशवंत डांगे, कार्यकारी अभियंता एस. टी. जावरानी, सुनील बेळगावकर, राजेंद्र शिंदे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, कंचनकुमार इंदलकर, राजेश भाट व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील विविध भागातील नाल्यांची तसेच, पाणी साठणार्या ठिकाणांची पाहणी केली. चिंचवड येथील मिल्कमेड बेकरी, आकुर्डी रुग्णालय, बजाज कंपनी समोरील सबवे, निगडी उड्डाण पुल, माता अमृतानंदमयी शाळा, राधा स्वामी सत्संग भवन, बालाजीनगर झोपडपट्टी, भोसरी उड्डाण पुल, धावडे वस्तीकडील उतार, पीसीएमची चौक, आदिनाथ नगर, आदिनाथ सोसायटीजवळील महामार्गाचा भाग येथील नाल्यांची तसेच, संभाव्य पाणी साठणार्या भागांची पाहणी आयुक्त शेखर सिंह यांनी केली.

पावसाळ्यामध्ये पूर स्थिती निर्माण होऊन नागरिकांच्या घरांमध्ये नाल्याचे पाणी जाणार नाही याची काळजी घेण्यात यावी. त्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्तांनी अधिकार्यांना दिल्या. आरोग्य विभागामार्फत शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत येणार्या सर्व १४४ नाल्यांची साफसफाई करण्यात आली आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

# तळेगाव रेल्वे स्टेशन बनले धोकादायक; निधीनंतरही विकासकामे ठप्प

**तळेगाव । प्रतिनिधी**

सहा महिन्यांपूर्वी सुस्थितीत असलेल्या तळेगाव रेल्वे स्टेशनच्या विकासासाठी अमृत भारत योजनेतंर्गत सुमारे ३६ कोटी रुपयांचा निधी मिळाल्यानंतर आनंदाचा पारावार राहिला नसलेल्या प्रवाशांना आज 'जुनं ते सोनं' म्हणण्याची पाळी आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जानेवारीत या रेल्वेस्टेशनच्या निधीची ऑनलाईन घोषणा आणि विकासकामांच्या प्रारंभाचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात केले होते. त्यानंतर संबंधित ठेकेदाराने तोडफोडीचे काम जोरदार सुरू केले; मात्र योजनेत समाविष्ट असलेल्या तिकिट घर, सुसज्ज फलाट, प्रवाशांच्या सोईसाठी असलेल्या सुविधांची कामे अर्धवट असून, केवळ सुशोभीकरणाच्या कामांवरच मोजके कारागिर काम करत असल्याचे चित्र आहे. दैनिक पुढारी प्रतिनिधीने स्टेशनची पाहणी केली असता जागोजागी खोदलेले फलाट, फलाटावर




आणि आसपास टाकलेला राडारोडा, अस्ताव्यस्त टाकलेले बांधकाम साहित्य आणि अडगळीत ठेवलेली बाकडी आणि धोका पत्करुन येजा करत असलेले प्रवासी निदर्शनास आले.

सुशोभीकरणाच्या कामांवर भर

केंद्र सरकारने अमृत भारत योजनेतंर्गत चिंचवड आणि तळेगाव स्टेशनच्या विकासासाठी मोठा निधी मंजूर केला आहे. दोन वर्षांपूर्वी लोणावळा स्टेशनचे काम वेळेत पूर्ण झाले आहे. चिंचवड स्टेशनच्या विकासाचे कामही वेगाने होत आहे. मात्र प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आवश्यक असलेली तळेगाव स्टेशनच्या पायाभूत विकासाची कामे ठप्प पडली आहेत. केवळ सुशोभीकरणाच्या कामांवरच ठेकेदारांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे गेल्या पाच महिन्यांपासून प्रवाश्यांना धोके पत्करून फलाटावर वावरावे लागत आहे. याबाबत स्टेशनच्या व्यवस्थापकांची भेट घेतली असता त्यांनी याबाबतची माहिती त्यांच्या अधिकारकक्षात येत नसल्याचे कारण सांगून कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

# म्हाडा कार्यालयात एसीबी ची धाड; २ लाख ७० हजार रूपयांची लाच घेताना प्रोजेक्ट मॅनेजरला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

म्हाडा योजनेतील सदनिका फेरवितरण पद्धतीने मिळवण्यासाठी अर्ज केल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या नावाने २ लाख ७० हजार रूपयांची लाच घेणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली आहे. पुणे स्टेशन परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संबधित प्रकरणात अटक करण्यात आलेल्याचे नाव कर्मचाऱ्याचे नाव अभिजीत




व्यंकटराव जिचकार (वय ३४, रा. वाकड) असं आहे. याबाबत एसीबीकडे एका ६० वर्षीय तक्रारदाराने तक्रार दिलेली होती. आरोपी अभिजीत म्हाडा कार्यालयात कंत्राटी कर्मचारी आहे.

मॅनेजरने तक्रारीकडे २ लाख ७० हजार रुपयांची लाच मागितली होती. लाचेच्या मागणीची पाच दिवस पडताळणी केल्यानंतर पुणे म्हाडाचे प्रोजेक्ट मॅनेजरवर गुन्हा दाखल करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, म्हाडाचे मुख्याधिकारी यांच्यासाठी २ लाख २० हजार तर प्रोजेक्ट मॅनेजर यांनी स्वतःसाठी ५० हजार रुपयांची मागणी केली. त्यानंतर २ लाख ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पंचासमोर अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणात पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक नितीन जाधव आणि पथकाने ही कारवाई केली आहे. पोलीस निरीक्षक वीरनाथ माने प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# महिन्यातच उखडला सिमेंटचा रस्ता; नागरिकांकडून चौकशीची मागणी

**येरवडा । प्रतिनिधी**

वडगाव शेरी गावठाणातील रस्त्याचे काम पूर्ण होऊन महिनादेखील झाला नाही, तोच त्यावरील सिमेंट उखडण्यास सुरुवात झाली आहे. हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. हे काम पाहणारे अधिकारी आणि संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

गेल्या एप्रिल महिन्यामध्ये वडगाव शेरी गावठाण येथील शनी मंदिरसमोरील रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आले होते. मात्र, या कामास एक महिनादेखील पूर्ण झाला नाही,




तो त्यावरील सिमेंट आणि खडी उखडू लागली आहे. रस्त्यावरील सिंमेट व खडी निघाल्यामुळे रात्रीच्या वेळी दुचाकी वाहने घसरून अपघात होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. गेल्या मार्च महिन्यात या कामास मंजुरी मिळाली होती. त्यानंतर एप्रिलमध्ये हे काम करण्यात आले. मात्र, एका महिन्यातच रस्त्याची दुरवस्था होऊ लागल्याने नागरिकांनी कामाच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या कामाची चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. वडगाव शेरी गावठाण येथील शनी मंदिरसमोरील रस्ता आमदार निधीतून झाला असून, हे कमा सार्वजनिक बांधकाम विभागाने केले असल्याचे महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता वैशाली भुक्तर यांनी सांगितले. दरम्यान, यासंदर्भात संबंधित अधिकार्यांशी संपर्क होऊ शकला नाही.

# दोन महिन्यांत ३०० कोटींचा कर जमा; पावणेतीन लाख मालमत्ताधारकांनी भरला कर

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका कर संकलन विभागाकडे अवघ्या ६० दिवसांत ३०८ कोटींचा मालमत्ताकर जमा झाला आहे. विविध कर सवलतींचा लाभ घेत २ लाख ७१ हजार ५०३ मालमत्ताधारकांनी मालमत्ताकर भरला आहे. सवलत ३० जूनपर्यंत लागू राहणार आहे.




शहरातील ६ लाख ३० हजार मालमत्तांची महापालिकेकडे नोंद आहे. कर संकलन विभागाने घरोघरी मालमत्ताकराची बिले वाटली आहेत; तसेच वसुली मोहीम सक्तीने राबविण्यात आली होती. त्यामुळे मालमत्ताधारकांनी रांगा लावून मालमत्ताकर भरला. एकूण २ लाख ७१ हजार ५०३ मालमत्ताधारकांनी ३०८ कोटी ४२ लाख ३१ हजार रुपयांचा कर जमा केला आहे. यामध्ये २ लाख ३९ हजार ४० निवासी मिळकती आहेत. २० हजार ७९९ बिगर निवासी, ६ हजार ८८ मिश्र, १ हजार ९७२ औद्योगिक तर, १६६१ मोकळ्या जमीन असणार्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे, असे कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

वाकड झोनमधून सर्वाधिक प्रतिसाद कर संकलन विभागाच्या शहरातील १७ झोनमधील वाकड झोनमध्ये सर्वाधिक ३९ हजार ७५९ नागरिकांनी बिलाचा भरणा केला आहे. सांगवीमध्ये २९ हजार ३८२, चिंचवडमध्ये २४ हजार १२४, थेरगावमध्ये २४ हजार ७२७, पिंपरी गावामध्ये १८ हजार ५२९ मालमत्ताधारकांनी कर भरला आहे. सर्वात कमी पिंपरी कॅम्प झोनमध्ये केवळ ३ हजार १९ जणांनी कर भरला आहे.

# भाडेकरूंची माहिती न दिल्याने गुन्हा दाखल

**नारायणगाव । प्रतिनिधी**

**भाडेकरूंची माहिती न** दिल्याने वारूळवाडी येथील गणेश खंडू डोके (वय ४२, रा. अभंग वस्ती, वारूळवाडी, ता. जुन्नर) यांच्यावर नारायणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती साहाय्यक पोलिस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.

दरम्यान, घरमालकांनी भाडेकरार करून भाडेकरूंची माहिती नारायणगाव पोलिस ठाण्यात देण्याचे आवाहन शेलार यांनी केले आहे. गणेश डोके यांनी वारूळवाडी ग्रामपंचायत हद्दीतील अभंग वस्ती येथे इतर राज्यातून व जिल्ह्यातून आलेल्या पाच जणांना पाच खोल्या भाड्याने दिल्या होत्या. हे भाडेकरू दोन वर्षापासून या ठिकाणी राहत होते. या भाडेकरूंबाबत त्यांनी नारायणगाव पोलिस ठाण्याला माहिती दिली नव्हती. पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक यांनी दिलेल्या आदेशानुसार घरमालकाने भाडेकरूंची माहिती संबंधित स्थानिक पोलिस ठाण्यास देणे बंधनकारक आहे. याबाबत नारायणगाव पोलिस ठाण्याच्यावतीने आवाहनही करण्यात आले होते. मात्र याकडे गणेश डोके यांनी दुर्लक्ष करून आदेशाचे उल्लंघन केले. याबाबत पोलिस कर्मचारी दत्तात्रेय सोपान ढेंबरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गणेश डोके यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# 'वायसीएम'मध्ये चाचण्यांसाठी बाहेरचा रस्ता; रूग्णांना नाहक त्रास

**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिकेच्या पिंपरी-संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थेत बहुतांश वैद्यकीय चाचण्यांची सुविधा असताना काही चाचण्यांसाठी बाहेरील पॅथॉलॉजी लॅबमध्ये रुग्णांना पाठविले जात आहे. रुग्णालय प्रशासनाला याबाबत विचारणा केली असता रुग्णालयामध्ये सर्व प्रमुख चाचण्या उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. चाचण्यांसाठी रुग्णांना बाहेर पाठविले जात असल्याच्या तक्रारी रुग्णांकडून प्राप्त झाल्यास त्याबाबत संबंधित डॉक्टरांना जाब विचारण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.




यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये सुमारे ४०० प्रकारच्या चाचण्या केल्या जात असल्याचे येथील पॅथॉलॉजी विभागाकडून सांगण्यात आले. मधुमेह, ॲनिमिया, उच्च रक्तदाब, हृदयरोग, मेंदुविकार, डेंग्यू, मलेरिया अशा विविध आजारांच्या येथे चाचण्या घेतल्या जातात. त्याशिवाय, यकृत आणि मूत्रपिंड आदींशी संबंधित चाचण्या देखील केल्या जात आहेत. त्याचप्रमाणे, रक्त तपासणीच्या विविध चाचण्या देखील येथे करण्यात येतात. कर्करोग, क्षयरोग आदींच्या गाठीची तपासणी करण्यात येते. तथापि, सायंकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत तातडीच्या चाचण्यांना प्राधान्य दिले जाते.

# चिप्स, कुरकुरे खाल्ल्याने माकड झाले लठ्ठ! नागरिकांच्या चुकीची शिक्षा प्राण्याला

**पुणे । प्रतिनिधी**

नागरिकांना प्राणी दिसला की, त्याला काहीही खायला द्यायची सवयच लागली आहे, जी अत्यंत घातक ठरत आहे. प्राण्यांचे खाद्य वेगळे असते आणि नागरिक त्यांना फास्टफूड खायला देतात. त्यामुळे प्राण्यांवर दुष्परिणाम होत असल्याचे समोर आले आहे. याचा फटका एका माकडाला बसला आहे. त्याला नागरिकांनी चिप्स, कुरकुरे व इतर तेलकट पदार्थ खायला दिल्याने ते माकड लठ्ठ झाले आहे. परिणामी त्याला आता वनविभागाच्या आणि रेस्क्यू ट्रस्टच्या ट्रान्झिस्ट ट्रीटमेंटमध्ये सेंटर दाखल केले



आहे.

दुर्गा टेकडी हे पिंपरी-चिंचवड शहरातील पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जात असून, या ठिकाणी अनेक प्रकारचे वन्यप्राणी, तसेच पक्षी आढळतात. गेली कित्येक वर्षे हे माकड देखील दुर्गा टेकडीमध्ये राहत होते; पण तिथे येणाऱ्या पर्यटकांनी या माकडाला रोज कोल्ड्रिंक, बिस्कीट, वेफर्स आणि इतर शिजवलेले, तळलेले अन्नपदार्थ खायला दिले, म्हणून त्याची अशी अवस्था झाली. उद्यानात फिरायला आलेल्या एका व्यक्तीने या प्रकाराची माहिती स्केल्स अँड टेल्स वाइल्डलाइफ निमल रेस्क्यू फाउंडेशन, पुणे या संस्थेस दिली. संस्थेतील सभासद घटनास्थळी पोहोचून माकडाची अवस्था पाहिली. ही संपूर्ण घटना स्केल्स अँड टेल्स संस्थेच्या सदस्यांनी वनविभागला कळविली. त्यानंतर वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली माकडाला रेस्क्यू उपचार केंद्रात हलविले.

# बाळाच्या आई - बापाला ५ जूनपर्यंत पोलीस कोठडी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील कल्याणीनगर भागात झालेल्या कार अपघातामुळे राज्यासह देशभरात संतापजनक वातावरण निर्माण झाले आहे. बिल्डर विशाल अग्रवाल यांच्या मुलाने भरधाव वेगाने आलिशान पोर्शे कार चालवत दुचाकीला धडक दिल्याने दोघांना विनाकारण जीव गमवावा लागलाय. या प्रकरणात अनेक धक्कादायक प्रकरणे उघडकीस येऊ लागली आहेत. पोलिसांनी विशाल अग्रवाल आणि सुरेंद्र अग्रवालसहित कुटुंबाची कुंडली बाहेर काढली आहे. आता तर बाळाच्या आईनेही या घटनेत पुरावे झाकल्याचे समोर आले आहे. मुलाच्या वैद्यकीय चाचणीदरम्यान ससून रुग्णालयात रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. ते मुलाच्या आईचे असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. तशी कबुली आईने पोलिसांसमोर दिली आहे. दोघांचीही सखोल चौकशी करण्यासाठी आज कोर्टात सरकारी वकिलांकडून युक्तिवाद करण्यात आलाय. त्यामद्धे विशाल आणि शिवानी अग्रवाल यांना ५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलीये.

न्यायालयात सरकारी वकिलांनी काही महत्वाचे मुद्दे मांडत पोलीस कोठडी मागितली. विधी संघर्षात बालकाचे हे पालक आहेत. रक्त बदलण्याच्या प्रकरणात पालकांचा थेट समावेश आहे. शिवानी अग्रवाल हिला



कोणीतरी सांगितलं आहे की ससून मध्ये जायला. रक्ताचे नमुने देण्यासाठी शिवानी यांना कोणी सांगितलं यासाठी तपास करायचा आहे. सखोल चौकशी साठी ७ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी. असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केलाय. साक्षीदार, एफ एस एल यांच्या तपासातून निष्पन्न झालं की विधी संघर्षात बालकाच्या ऐवजी आईचे रक्त वापरण्यात आले. या सगळ्या षडयंत्रमध्ये आणखी काही आरोपी असण्याची शक्यता आहे. दोन्ही आरोपींचे डी एन ए सँपल घ्यायचे आहेत. ३ लाख रुपये कोणाकडून घेतले याचा तपास करायचा आहे. मूळ रक्त नमुने आणि त्यातील सिरींज कोणाला दिली याचा शोध घ्यायचा आहे. विशाल, शिवानी यांच्या घराची झाडाझडती आहे. तसेच सी सी टिव्ही फुटेज जे मिळालं आहे त्यात छेडखानी झालीये त्याची चौकशी करण्यासाठी पोलीस कोठडी चौकशी अधिकाऱ्यानी मागितली. या मुद्द्यांवरून दोघांना ५ जूनपर्यंत कोठडी सुनावण्यात आली. आरोपीच्या वकिलांनीसुद्धा युक्तिवाद केला. १९ तारखेला अपघात झाल्यानंतर घराची झाडाझडती घेण्यात आली आहे. सी सी टिव्ही सुद्धा जप्त करण्यात आले आहेत. दोन्ही आरोपींनी स्वतःहून पोलिसांना सरेंडर केले आहे. तपास अधिकाऱ्यांना कधी ही गरज लागली तर आरोपी हजर राहतील. असे मुद्दे मांडत म्हणून न्यायालयीन कोठडीची मागणी केली होती.